# माणूस

शनिवार । २० फेब्रुवारी १९७१ । चाळीस पैसे


# स्थिर सरकारचा बागुलबुवा इंदिरा समर्थक का नाचवीत आहेत ?

– श्री. ग. मां.

शनिवार २० फेब्रुवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : त्रेसष्टावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ 'माणूस'विषयी काही विचार–

निवडणुकांचे संबंधीचे लेख खरोखरच छान आहेत. अभिनंदन. क्रीडांगण सदर वाचनीय आहे. बृहन्महाराष्ट्रातील क्रीडांगणावर सतत चमकणाऱ्या पुष्पा भा. मोदकरच्या उल्लेखाचा अभाव जाणवतो.

'माणूस'मधील कथा सर्वसाधारणपणे सुमारच असतात. कथांसोबत असलेली चित्रे अगदीच 'फ्लॅट' असतात. त्यामुळे चांगल्या कथा पण निकृष्ट चित्रांमुळे अनाकर्षक होतात. 'माणूस'ची विज्ञानेश्वरी उत्तम. अशीच वाढत रहावी. विज्ञानाच्या युगात 'माणूस'च्या वाचकांना 'अंदाज' वाचावयास लावून त्यांची विज्ञानदृष्टी साकळवू नये ही विनंती. शिवाय किमान चार पाने वाचतील व काही क्रिएटिव मजकूर आम्हाला वाचावयास मिळेल. 'हे कलकत्ता'ला एक पान पुरे. कलकत्ता पेटला आहे हे पुनः पुनः सांगणे नको. तेथेही काही व्यक्ती वा संस्था ही आग विझविण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांना प्रसिद्धी द्यावी.

दिल्ली वार्ता छान असते. एकूण 'माणूस' प्रगती करीत आहे. त्यात आकर्षकपणा वाढावा व फालतू 'अंदाज' नसावेत ही इच्छा.

१३ फेब्रुवारी, १९७१ — डॉ. मुकुंद कोल्टकर, इंदौर

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# नेमस्तशाहीचा नवा अवतार

# स्थिरसरकारवाद

श्री. ग. मा.

उजवा ठोस राष्ट्रवाद; आकर्षक पण पोकळ समाजवाद.

पुणेकर नागरिकांसमोर हे दोन अपूर्णांक आज उभे आहेत.

कार्यानुभव, वैयक्तिक पात्रता, तळमळ, चारित्र्य या दृष्टीने धारिया–म्हाळगी यांच्यात डावेउजवे ठरविणे कठीण आहे. पुणेकर नागरिकांना या उभयतांबद्दल पूर्ण आदर आहे, उभयतांचे आजवरचे कार्य पुणेकरांना गौरवास्पदच वाटते.

पण विचारांचा मागोवा घेतल्यास काय आढळते ?

माणूस प्रतिनिधी शरद कृष्णन् यांनी 'महाराष्ट्र काँग्रेस समाजवादी आहे काय?' असा सरळच प्रश्न श्री. धारिया यांना विचारला. (पहा : माणूस, १७ फेब्रुवारी) धारियांनी अर्थातच महाराष्ट्र काँग्रेसच्या समाजवादी स्वरूपाबद्दल ठामपणे ग्वाही दिली. ठरावापुरते पहायचे तरच ही ग्वाही खरी धरून चालता येईल. अनुभव व वस्तुस्थिती अशी आहे, की महाराष्ट्र काँग्रेसवर जमीनदार–बागायतदार वर्गाचे पूर्ण वर्चस्व आहे. खुद्द धारियांचाही या 'आतल्या गोटात' चंचुप्रवेश आजवर झालेला नाही. 'कमाल जमीनधारणेची मर्यादा खाली आणू देणार नाही,' ही मुख्यमंत्री परिषदेतील श्री. वसंतराव नाईक यांची घोषणा कुठल्या समाजवादात बसते ? जमीन बळकाव आंदोलनाची तर त्यांनी हेटाळणीच केली. जुळी मुंबई हा मक्तेदार-भांडवलशाहीचा नवा किल्ला आज कोण उभा करीत आहे ? बेळगावला निघण्यापूर्वी मुंबईच्या विमानतळावर नाथ पै परवा संतापून बोलत होते : 'अरे ! माझ्याविरुद्ध एका संस्थानिकाला उभे करता ? कसला तुमचा हा समाजवाद ?'

धारियांजवळ या विसंगतीचे उत्तर असेल असे वाटत नाही. शिवराम राजे भोसले समाजवादी, सोलापूरचे दमानिशेठ समाजवादी, श्रीरामपुरातले सर्वाधिक सधन बागायतदार बाळासाहेब पाटीलही समाजवादीच ! समाजवाद या शब्दाची ही घोर विटंबना आहे असे धारियांना वाटत नाही काय ? इंदिरा काँग्रेसला निष्ठापूर्वक सतत पाठिंबा देणारे दिल्लीचे Link हे साप्ताहिक महाराष्ट्र काँग्रेसबाबत काय अभिप्राय व्यक्त करते ते धारिया यांनी सहज पाहून ठेवावे. चालू २६ जानेवारी विशेषांकात महाराष्ट्र काँग्रेससंबंधी ' लिंक 'ने लिहिले आहे :

The Rightist parties do not have any place in Maharashtra politics. The main reason is that the Maharashtra congress is a party of the Right in state politics, since it represents the new vested interests of the rich peasantry and co-operative captalism as also the new urban entrepreneurs. In national politics the Maharashtra congress is regarded as a progressive party. The reason being that rich peasant interests as also the interests of the new entrepreneurs in urban centres compel it to adopt progressive potsures on issues like bank nationalisation.

[ महाराष्ट्राच्या राजकारणात उजव्या पक्षांना काहीही स्थान नाही. याचे मुख्य कारण महाराष्ट्र काँग्रेस हाच एक उजवा पक्ष आहे. श्रीमंत जमीनदार, सहकारी भांडवलशाही व शहरातून नव्याने उदयास आलेल्या व्यापारी-कारखानदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा हा पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात उजवा आहे. भारतीय स्तरावर मात्र महाराष्ट्र काँग्रेस पुरोगामी समजली जाते. वरील उजव्या गटांची दडपणेच याला कारणीभूत आहेत. ]

यशवंतराव चव्हाणांच्या दुटप्पी राजकारणाचा उलगडा ही वस्तुस्थिती अधिक बारकाईने तपासल्यावर कोणासही करून घेता येईल. घरात सनातनी, बाहेर सुधारक असा एक विचित्र प्रकार आपल्याला अनेक ठिकाणी पाहायला मिळतो. महाराष्ट्र काँग्रेस ही या प्रकारात बसणारी एक संघटना आहे. मन तर ज्युलिएटवर बसलेले आहे, लग्न तर शहाण्णव कुळीच्या कुळवंतिणीशी होऊन चुकलेले आहे. म्हणून काल सिंडिकेट, आज इंडिकेट, असे सारखे फिरावे लागते. मुळाशी फारसा धक्का न पोचवणारा, संस्थानिकांच्या टोप्या उडविण्याचा निरुपद्रवी खेळ फार तर खेळता येतो. हलवायाच्या घरावर परस्पर तुळशीपत्र. शेतीवरील जादा उत्पन्नावर कर ? ब्र सुद्धा उच्चारू देणार नाही. महाराष्ट्र काँग्रेसचा समाजवाद हा श्रीमंताघरच्या सोनेरी पिंजऱ्यातल्या पोपटापेक्षा वेगळा नाही. या पोपटाच्या मिठु मिठु बोलावर लोक किती काळ झुलवत ठेवता येतील अशी धारियांची समजूत आहे ?

मुस्लीम लीग-नवकाँग्रेस सोयरिकीबद्दल धारिया यांचे मत स्वाग्तार्ह आहे. प्रश्न हा आहे, की संस्थानिकांच्या क्षुल्लक प्रश्नावर गहजब उडविणारे धारिया या सोयरिकीविरुद्ध उघड कृती नेमकी केव्हा, कुठे आणि कशी करणार आहेत? परकीय देशांची मदत आपण नको नको म्हणून घेतच राहतो. तसेच हे प्रकरण चालू राहणार काय? उक्ती आणि कृती यांचा मेळ घातला जाईल, नाराजी आणि रुसवेफुगवे यांच्यापुढे जाऊन विरोध कणखरपणे नोंदविला जाईल याची हमी राष्ट्रवादी धारियांकडून मतदारांना हवी आहे. तशी हमी अद्याप तरी धारियांनी दिलेली नाही.

तसेच हे स्थिरसरकारवादाचे बुजगावणे. स्थिर सरकारची मागणी ही आपल्या आसनाला जपू पाहणाऱ्या, सुखवस्तु व जैसे थे वृत्तीच्या, स्वास्थ्यप्रिय लोकांकडूनच बहुधा केली जात असते. दिल्लीश्वर औरंगजेबच्या आरामशीर नजर-कैदेतून सुटून आलेल्या शाहू महाराजांची ही पूर्वापार भूमिका आहे. म्हादजी शिंदे ही तर उत्तर पेशवाईतील केवढी मातब्बर शक्ती? पाटीलबावांनी फुंकर मारली असती तरी दिल्लीची मोगल पातशाही उडून जाऊ शकत होती. पण शेवटपर्यंत दिल्लीपतींच्या सनदा ते गोळा करीत राहिले. आपणच पातशाही पालथी घालून हिंदुपदपातशाह व्हावे हे शिवाजीचे भव्य स्वप्न साकार करावे, असे त्यांना कधी वाटलेच नाही. भाऊंनीही दिल्ली दरबारची तख्तपोशी फोडली. तख्तावर स्वार होण्याचा विचार त्यांनाही मानवला नव्हता. पातशाही कोसळली तर बंडाळ्या उद्भवतील, धांधागुंदी माजेल हे भय मराठ्यांना शेवटपर्यंत वाटत राहिले होते. शाहू छत्रपतींचा हा वारसा, दुसरे काय? पराक्रम करावा, पण चौथाया आणि सरदेशमुख्या यावर समाधान पावावे.

ज्याला आमूलाग्र बदल हवा आहे त्याने धोका हा पत्करलाच पाहिजे, अंगावर तो उलटणारा असला तरी. 'पन्नास टक्के लोक जरी माझ्यामागे असतील तरी उरलेल्या पन्नास टक्क्यांसाठी परमेश्वरावर विश्वास टाकून मी बंडाळा लगेच सुरुवात करीन' असे म्हणणाऱ्या लोकमान्यांच्या 'केसरी'ने स्थिरसरकारची नेमस्तवादी भूमिका आजकाल उचलून धरावी हा शिवाजी आणि शाहू महाराज यातीलच फरक म्हटला पाहिजे.

आणि इंदिरा गांधींनी तरी स्थिरतेची पर्वा कुठे ठेवली? बंगलोरला चव्हाणांनी हीच भीति बाईंसमोर व्यक्त केली. चव्हाणांचा शब्द होता 'unity-कॉंग्रेसची एकता'. बाई ताडकन् उद्गारल्या 'unity? for what?' कशासाठी स्थिरता? आणि बाईंनी कॉंग्रेस मोडण्याचा, वेबंदशाहीचा धोका पत्करूनही अंधारात उडी घेतली— जी सुदैवाने अचूक पडली. उद्या विरोधकांनाही हे यश कशावरून लाभणार नाही? वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपोटी स्वपक्षात व देशातही अराजकाचा, फाटाफुटीच्या

पृष्ठ ५४ वर

# एक व्यासपीठ

## सात मिनिटे

सप्रु हाऊस. दिनांक १० फेब्रु. संध्या. ६ वाजता.

बडया लोकांच्या बडया सभांचं ठिकाण. यावेळी संयोजक दिल्ली ज्युनियर चेंबर.

विषय : मत कुणाला देणार ?

वक्ते : सर्व पक्षांचे प्रतिनिधिक उमेदवार. आमंत्रण सर्वांना.

हवेतला गारठा निघून गेलेला, वेळ सर्वांना सोयीची. त्यामुळे ही ऽऽ गर्दी. संयोजकांचा अंदाज चुकला. हॉल खच्चून भरला. बाहेर त्यापेक्षाही जास्त गर्दी. दारावर पोलिस उभे. त्यांना बाहेर हटवून आत शिरण्याचा गर्दीचा प्रयत्न. चेंबरचे कार्यकर्ते, पोलीस, स्वयंसेवक घामाघूम झालेले. सभा बाहेर हिरवळीवर घेण्याचा आरडा ओरडा सुरु झाला. आत माईक ठेवून बाहेर लाऊडस्पीकर लावण्याची पर्यायी सूचना.

कोणीही संयोजकांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. आत सभा सुरु होण्याच्या बेतात होती.

मी एकाला धरले, त्याच्या छातीवर बिल्ला होता. आत नेण्याची व्यवस्था करा म्हणून विनंती केली, 'पत्रकार, पत्रकार' म्हणून क्षीण प्रयत्न केला. त्याने आपल्या कोटाच्या आतले खांदे उडवून असमर्थता प्रकट केली.

मग सभ्यता, शिष्टाचार गुंडाळून गर्दीत घुसलो. एव्हाना पोलीस थकले होते.

गर्दीचा लोंढा आत शिरू लागला होता. त्यात उभा राहिलो आणि आपोआप हॉलच्या मध्यापर्यंत जाऊन पोहोचलो. दोन रांगातूनही लोक उभे होते.

माईकची व्यवस्था होत होती. पंखे सुरू करण्याची मागणी सुरू झाली. ते सुरू झाले तेव्हा थोडा मोकळेपणा आला.

चेंबरच्या अध्यक्षांनी माईकवर टिचकी मारून ठाकठीक असल्याची खात्री केली आणि सुरुवात केली 'फ्रेंड्स्, वुइ हॅव ग्रेट प्लेझर टू–'

'हिंदी, हिंदी' 'वी वॉन्ट हिंदी' अशी मागणी आंग्ल' भाषेत सुरू झाली. सभेचे पर्यवसान काय होणार हे त्या घोषणांनीच स्पष्ट होऊ लागलं.

अध्यक्षांनी मग हिंदीत सभेचे प्रयोजन सांगितले. निरनिराळ्या पक्षांच्या उमेदवारांना एकाच व्यासपीठावर बोलावून आपापल्या भूमिका सात मिनिटात मांडायच्या होत्या.

सुरुवात झाली संघटना कॉंग्रेसचे सालवान यांच्या भाषणाने. 'मला कोणत्याच पक्षाविषयी प्रेम नाही. सर्वच पक्षांनी माझ्या संघटना कॉंग्रेससह–गेल्या तेवीस वर्षात काहीही केलेले नाही–'

'मग फिर छोड दो तुम्हारी पार्टी' कोणीतरी श्रोता ओरडला. 'सालवान मुर्दाबाद' 'इंदिरा गांधी झिंदाबाद' सुरू झालं.

सालवान विद्यापीठ सुधारणा मंडळाची स्थापना करण्याचे बोलत होते. कुणीही त्यांचे ऐकण्याचे मन:स्थितीत नव्हते. कुणाला श्रीमती मुकुल बॅनर्जी हव्या होत्या, कुणाला शशीभुषण, कुणाला एम्. एल्. सोंधी तर कुणाला प्रा. बलराज मधोक.

गर्दी वाढत होती.

व्यासपीठावर सोंधी दिसत नव्हते, शशीभूषण दिसत नव्हते.

सालवान इंदिरा कॉंग्रेस, जनसंघ, लीग, सं. सो. प, स्वतंत्र अशा सर्वच पक्षांवर झोड उडवित होते. एवढ्यात एका दाराच्या बाजूने 'एम्. एल्. सोंधी झिंदाबाद'च्या घोषणा सुरू झाल्या. सोंधी आले होते, त्यांना आत शिरायला जागा नव्हती.

खुर्च्यांवरून उड्या मारत त्यांनी नाट्यमय प्रवेश केला. लोक त्यांना उचलून पुढच्याच्या हवाली करत होते.

स्टेजवर सालवान हताश होऊन माईक हातात धरून उभे होते. गोंधळ वाढला होता. घोषणा वाढत होत्या.

दुसरा माईक हातात ओढून सोंधींनी शुक्रिया केलं आणि शांत राहून सर्वांचं म्हणणं ऐकू या असं आवाहन केलं.

एव्हाना सालवान यांची सात मिनिटं संपली होती.

श्रीमती मुकुल बॅनर्जी पुढे आल्या.

–'इंदिरा गांधी झिंदाबाद' 'समाजवाद झिंदाबाद'

'मी अखिल भारतीय कॉंग्रेसतर्फे उभी आहे–'

–' इंडिकेट कहो, इंडिकेट '–

' जी हॉं, मैं इंदिराजी की नेतृत्ववाली कॉंग्रेसकी उम्मीदवार हूँ '

–इंदिराजी नही, जगजीवनराम जगजीवनराम.–

प्रा. मधोक पुढे सरसावले, माईकमधून म्हणाले, 'लक्षात असू द्या, आपण एका महिलेचे भाषण ऐकत आहोत. सभ्यता पाळू या.'

गर्दी वाढत होती. मागचा पुढच्याला रेटत होता. वातावरण चमत्कारिक गरम झाले होते. बॅनर्जी बोलत होत्या.

'समाजवादका मतलब है कि गरीबोंको खाना मिले, कपडा मिले, शिक्षा मिले. लेकिन हम देखते है कि गरीब गरीबही रह जाते है, पुंजीपती और टॅक्स चुकानेवाले और मालोमाल होते जाते है–'

एका खुर्चीच्या पायावर उभा राहून आणि माझ्या खांद्यावर हात टेकून एक हिरवा स्वेटरवाला ओरडला, 'हाय रे हाय, जगजीवनराम–'

दहा वर्ष टॅक्स भरायला 'विसरलेल्या' या केंद्रिय मंत्र्याची आणि कॉंग्रेस अध्यक्षांची ती कथा अजून पब्लिक विसरलेलं नाही –

– 'जगजीवनराम हाय हाय' –

बरोबर विरुद्ध टोकाला एक चष्मेवाला असाच खुर्चीवर उभा होता. त्याचे टोळके ओरडले, 'महात्मा गांधी की जय'–

हिंदुमहासभेचे आय्. एस्. शर्मा आले. त्यांनी आरंभीच घाव घातला, 'भारत पौरुषहीन होत चालला आहे. देशात वीस टक्के हिंदु तर पंचवीस टक्के मुसलमान झाले आहेत '–

–शेम, शेम इंदिरा गांधी शेम, शेम–

'या सेक्युलॅरिझमने सर्व देशाचं वाटोळं केलं आहे. ख्रिस्ती मिशिनरी येतात, पैसा उधळतात. आमच्या गरीबांना अन्न देतात, औषध देतात आणि त्यांना ख्रिस्ती करून टाकतात.'

हिरवा स्वेटरवाला ओरडला, 'तुम उनको अनाज दो, वो हिंदुहि रहेंगे.' आसपासच्यांनी त्याला दटावलं.

शर्मांनी भाषणाचा शेवट आकर्षक केला. 'सेक्युलॅरिझम हटाओ, भारत को बचाओ.'

तिसरं एक टोळकं तयार झालं होतं. त्याचा म्होरक्या ओरडला, 'इंदिरा हटाओ, लोकशाही बचाओ.'

आता श्रोते अस्वस्थ होऊ लागले होते. धड काहीच नीट ऐकता येत नव्हते. कुणीही उठून आपली प्रतिक्रिया ओरडत होता.

केंद्रीय नोकरांचे प्रतिनिधी म्हणून एस्. मधुसुदन निवडणुकीच्या रणांगणात

उतरले आहेत. आपली १९ वर्षांची नोकरी सोडून त्यांनी ' अपने साथीयोंके लिये ये कुर्बानी की. ' मुंबईत बोलतात तशा खास हिंदीत त्यांनी सुरुवात केली, ' कॉम्रेड्स, हमने तीन स्ट्राईक लीड किया '–

चष्मेवाला–' और सब फेल हो गया '–

तिकडे दुर्लक्ष करून त्यांनी सुरू ठेवलं, ' अपने खूनकी आखरी बूंद तक हम फाइट करेगा, किसीसे नही डरेगा '–

एकंदरीत हे भाषण बऱ्याच चांगल्या प्रकारे ऐकता आलं. कदाचित श्रोत्यात केंद्रीय नोकर बरेच असावेत–

जनसंघाचे एम्. एल्. सोंधी.

–' य्यम्मेल सोंधी झिंदाबाद ', ' इंडियन केनेडी झिंदाबाद '–

या माणसाला आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे. दिल्लीच्या तरुणांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा आहे. आपल्या प्रत्येक गोष्टीची छाप कशी पाडायची हे त्यांना चांगलंच अवगत आहे.

' देशाला प्रतिष्ठा मिळवून द्यायची आहे. इंदिरा गांधींचे सरकार ती धुळीला मिळवीत आहे. पाकनं विमान जाळून नाक कापलं आहे '–

मधल्या घोळक्यातून घोषणा ' मुर्दाबाद–कॉंग्रेस लीग मुर्दाबाद '–

' तेवीस वर्षं एकच पक्ष राज्यसत्तेवर आहे. लोकांच्या गरजा विसरला आहे '–

क्षणापूर्वी कॉंग्रेसला शिव्या घालणाऱ्या घोळक्यातून आवाज आला, ' आप भी भूल जाओगे '–

सोंधींच्या बोलण्याची शैली राजकपूरची आठवण करून देते. ते बोलत राहिले, ' जनसंघाने अनेक इशारे दिले. पण कोणी ऐकले नाही, आमची चेष्टाच झाली '–

क्षणभर थांबून त्यांनी आपल्या खास नाटयपूर्ण झोकात खिशातून तीन-चार कागद काढले. ' हा सगळा प्लॅन आमच्या हाती आला आहे. काश्मिरमधील घातपातासंबंधीचा कोणाही वर्तमानपत्राने तो प्रसिद्ध करण्याचे धाडस दाखविले नाही. '

वर्तमानपत्रांच्या छायाचित्रकारांचे कॅमेरे चकाकले.

' जनसंघ सत्तेवर आला तर स्थिर किंमतीसाठी प्राण पणाला लावील. प्रत्येक कुटुंबाला घर देईल. '

–झिंदाबाद झिंदाबाद–

' देशाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी लढलेल्या सुभाषबाबूंचे नाव घेणेही आज पाप झाले आहे–'

–कौन कहता है ?–

–शेम, शेम गांधी सरकार मुर्दाबाद–

सात मिनिटे संपली.

प्र. स. पक्षाचे तुफान उभे राहिले. ' इस सब महाभारतमें मुझे प्रजासमाजवादी

पार्टीको कोई भी पांडव नजर नही आता, सब कौरव है–'

–जियो मेरे लाल–

–भाई, तुम्हारी पी. एस्. पी. भी तो पर्मनंट स्लीपिंग पार्टी है–

'हम सब लोकशाही पर भरवसा करते है. इसीलिये यहाँ इस तरह विचार विनिमय करने आ सकते है.'

घोषणा–प्रतिघोषणात आता लोक हमरी तुमरीवर आले होते. हिरव्या स्वेटर-वाल्याच्या कुणीतरी थोबाडीत मारली. तो खाली पडला, एकदम माझ्या अंगावर. काय होते आहे याचा अर्थबोध होत नव्हता. रेटारेटी सुरू झाली.

तिकडे तुफान बोलत होते, 'हम एक दुसरोंका आदर करते है. शांती हमारी शक्ती है.'

दोन तीन ठिकाणी झोंबाझोंबी सुरू झाली. तो चष्मेवाला ओरडला, 'मधोकजी, यहाँ गुंड बाजी शुरू हो गयी है–' पोलिस धावले.

मधोक बोलायला उभे राहिले.

गोंधळ वाढत होता. थोडीफार धक्काबुक्की सहन करत मी व्यासपीठाच्या जवळ येऊन पोहोचलो होतो.

अध्यक्ष हात जोडून शांत रहाण्याची विनंती करत होते.

मधोक म्हणाले, 'कोणीतरी भाडोत्री गुंड आणून आमचे भाषण उधळत आहे.' –चेंबरच्या एकाने माईकवर हात ठेवून ते शब्द रोखण्याचा प्रयत्न केला.

'मधोक झिंदाबाद' 'गांधी झिंदाबाद' – मग 'मुर्दाबाद' 'हाय हाय' सुरू झाले.

मधोक ओरडले, 'कृपया सब शांती रखीये.'

क्षणभर शांतता झाली.

'बोलिए, भारत माता की–'

'जय'

'लोक तंत्र–'

चिरायु हो.'

सभा आटोक्यात आली असं क्षणभर वाटलं.

मधोकनी सुरुवात केली.

पण ते अशक्य होते.

कुणीही ऐकत नव्हतं.

सात मिनिटे ते बोलत राहिले.

अजून दोघे तिघे बोलणार होते. पण अध्यक्षांनी लगेच 'जन गण' सुरू केलं. चार चार माईकवरून चालू असलेलं राष्ट्रगीत शांतता निर्माण करू शकलं नाही.

□ □ □

सौ. तारा पंडित

## कलकत्यात प्रजासत्ताक दिन

१. झेकोस्लाव्हाकिया व इंडोनेशिया या दोन वकालतींवर बाँबहल्ले झाले.

२. एकूण अकरा माणसांचे खून झाले. त्यात दोन व्यापारी, एक C. P. I. (M) चा पुरस्कर्ता, एक सोळा वर्षाचा मुलगा व बाकी इतर हे होते.

३ श्री. ज्योती बसू हे बासिरहाट येथे एक सभा घेण्यासाठी म्हणून जात असताना त्यांच्या गाडीवर हल्ला झाला. तसेच त्यांच्या गाडीमागून जाणाऱ्या पोलिसांच्या गाडीवरदेखील हल्ला झाला. अर्थात ज्योती बसूंना काहीच इजा झाली नाही. त्यांच्या गाडीचे मात्र नुकसान झाले. ती गाडी नंतर पोलिस ठाण्यावर आणून ठेवली असताना काही व्रात्य मुलांनी आणखी तोडताड करण्याचे प्रयत्न केले पण त्यांना ताबडतोब पकडण्यात आले. त्याच दिवशी संध्याकाळी साडेसहाचे सुमारास बासिरहाटवरून बडाचापा येथे जात असताना ज्योती बसूंवर पुन्हा हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. यावेळी ते जीपमध्ये होते. जीपसह ते सुरक्षित राहिले.

बहुतेक सर्व पक्षांच्या नेत्यांनी ह्या हल्ल्याबद्दल निषेध व्यक्त केला. श्री. ज्योती बसुंचे बाबतीत पश्चिम बंग सरकारतर्फे पोलीस सुरक्षेची व्यवस्था करण्यात आली असतानाही त्यांचेवर हल्ला होऊ शकतो, याचा अर्थ इतर पक्षांचे उमेदवार ज्यांना पोलिस संरक्षण कधीच मिळाले नाही, त्यांचे जीवन कितीतरी धोक्यात आहे! C. P. I. (M) पक्षाचे प्रांतीय चिटणीस श्री. प्रमोद दासगुप्त ह्यांनी हल्लेखोरांना उद्देशून म्हटले की, 'मार्क्सवादी नेत्यांचा खून करण्यास प्रवृत्त होणे म्हणजे विस्तवाशी खेळ आहे हे त्यांनी लक्षात ठेवावे.'

अशाही परिस्थितीत प्रजासत्ताक दिनानिमित्त होणारी परेड बघण्यास मैदान लोकांनी खच्चून भरले होते.

## इलेक्शन ऑफिसरची डोकेदुखी

पश्चिम बंगालचे प्रमुख इलेक्शन ऑफिसर श्री. राघवन् म्हणाले की, मतदानाचे दिवशी मतदान केंद्रावर ड्यूटी करण्यास तयार असणाऱ्या सरकारी ऑफिसरांची

यादी अजूनही त्यांचेपर्यंत आलेली नाही. वास्तविक ही यादी देण्याची अखेरची तारीख २१ जानेवारी होती. अजूनही वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये 'पोलिंग ऑफिसरची ड्यूटी' करण्यासाठी ऑफिसर लोकांची मने वळवण्याचे काम चालू आहे. गेल्या निवडणुकांचे वेळी प्रत्येक मतदान केंद्रावर एक मुख्य व इतर पाच मदतनीस अशा सहा ऑफिसरांनी काम केले होते. यावेळी मात्र पाच ऐवजी फक्त तीनच मदतनीस राहतील. याचा अर्थ संपूर्ण बंगालमध्ये एकूण साठ हजार पोलिंग ऑफिसर मागच्या वेळेपेक्षा कमी राहतील. तरीदेखील अजून यांच्यांचा पत्ता नाही आणि हीच श्री. राघवन् यांची डोकेदुखी आहे. गेल्या निवडणुकांचे वेळी फक्त कलकत्त्यातून तीस हजार लोक पोलिंग ड्यूटीसाठी तयार होते. यावेळी मात्र केवळ चार हजार नावेच आली आहेत. बिचारे राघवन् काळजीने चूर झाले आहेत!

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा—गेल्या वेळच्या निवडणुकांचे वेळी मतमोजणी ही त्या त्या मतदान केंद्रानुसार होत असे. परंतु यावेळी एक नवी पद्धत अमलात आणली जाईल. ती अशी की प्रत्येक मतदान केंद्रावरून मतपेट्या मुख्य केंद्रावर आणल्यानंतर व पहिली मोजणी झाल्यानंतर सर्व चिठ्ठ्या एका मोठ्या ड्रममध्ये एकत्र करून मिसळण्यात येतील व नंतर पुन्हा दुसरी मोजणी सुरू होईल.

आता या पद्धतीला वेगवेगळ्या जिल्ह्यातील इलेक्शन ऑफिसर्सनी हरकत घेतली असून त्यांचे मते ह्या नव्या पद्धतीप्रमाणे मोजणी दोनदा करावी लागेल व त्यात फार वेळ खर्च होईल. शिवाय एखाद्या विशिष्ट केंद्राचे बाबतीत काही गड-बड घोटाळा निर्माण होऊन पुन्हा मतदान घेण्याचा प्रसंग उद्भवला तर पुन्हा घोटाळा निर्माण होणार कारण तेथील मत-चिठ्ठ्या इतर केंद्रातील चिठ्ठ्यांमध्ये मिसळलेल्या राहणार.

ही शंका ऐकून घेतल्यावर श्री. राघवन् म्हणाले की, याबाबतीत ते मुख्य इले-क्शन ऑफिसरबरोबर चर्चा करतील.

## हा ताप कोणता ?

नेहमीप्रमाणे रविवारी मृणाल आपल्या डॉक्टर मित्राकडे गेला. पाचसहा माणसं बाहेरच्या बाकावर तिष्ठत बसलेली होती. तो जरा खट्टू झाला. कारण या सर्वांना बाहेर घालवल्याखेरीज त्याचा मित्र त्याच्याशी गप्पा मारायला मोकळा होणार नव्हता. म्हणजेच त्यालाही आता तिष्ठत बसावं लागणार हे ओघाने आलंच.

डॉक्टरांच्या चेंबरमध्ये एक लाकडाचं पार्टिशन असून पलीकडन डॉक्टर बसत. पार्टीशन जास्त जाड नसल्यामुळे पलीकडचं संभाषण सहज ऐकू येण्याची शक्यता होती. मृणाल गेला तेव्हा असेच बोलण्याचे आवाज ऐकू येत होते. प्रथम प्रथम त्याने तिकडे दुर्लक्ष केलं नंतर आपोआपच त्याचं लक्ष संभाषणाकडे वेधलं गेलं,

कारण डॉक्टरांचा खडा आवाज कानात शिरतच होता. अर्थात प्रत्येक शब्दन् शब्द कळतच होता असं मात्र नाही. पण अर्थबोध जरूर होत होता.

"ह्या तापावर आता काहीतरी उपाय योजलाच पाहिजे..." डॉक्टर म्हणत होते. मृणालला वाटलं मलेरियाबद्दल ते बोलत असावेत. मलेरियाची साथ आली की काय होतं ह्याची चित्रं त्याच्या डोळ्यासमोर उभी राहिली. विशेषतः लहानपणच्या अनेक आठवणी साकार झाल्या. ह्या विचारांच्या तंद्रीत पुढचं बोलणं ऐकू आलं नाही. म्हणून तो पुन्हा लक्ष देऊन ऐकू लागला. डॉक्टर म्हणत होते–

'.. ह्या तापाने लहान मुलांऐवजी मोठी माणसंच पछाडली जातात...काहींवर त्या तापाचा इतका परिणाम होतो की ते पागल होतात. इतकंच नव्हे, पण तो ताप उतरल्यानंतर लोकांनी आत्महत्या केल्याची उदाहरणं मला माहीत आहेत... विशेषतः लोकांच्या डोळ्यांवर ह्या तापाचा फार परिणाम होतो. कुणाचे डोळे लाल होतात, कुणाचे जांभळे...'

'म्हणजे हा मलेरिया नसावा. कारण ही लक्षणं तर वेगळीच दिसतात.' मृणाल मनाशी म्हणाला.

डॉक्टर म्हणत होते–

'...ह्या तापामुळे निद्रानाशाचा रोगही नकळत जडतो आणि तापामध्येच रोगी झोपेच्या गोळ्या खाऊ लागतो. अशा वेळी झोपेच्या व गुंगी आणणारे द्रव पदार्थ यांचा भरमसाट खप होतो. विशेषकरून स्त्रियांपेक्षा पुरुषच ह्या विचित्र तापाला बळी पडतात आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या आवाजावर त्याचा भलताच परिणाम होतो...मग त्यांना खूप जोरजोराने ओरडावसं वाटतं...त्यांच्या डोळ्यावर कसलीतरी धुंदी चढते...मग त्या धुंदीतच ते अनेकांना अनेक वचनं देऊन बसतात...सांगायचं म्हणजे ह्या तापाची साथ सर्व देशांमध्ये आढळून येते. अजून तरी त्यावर रामबाण उपाय सापडलेला नाही...'

मृणाल अगदी कान देऊन हे सारं ऐकत होता. त्याला नवलच वाटलं. तो विचार करू लागला. डॉक्टर विद्यार्थ्यांना काही महत्त्वाचे समजावून देत असावेत. अधिक पैसे मिळावे ह्या हेतुने कदाचित प्रायव्हेट क्लासेस सुरू केलेत की काय ह्यांनी? आणि इकडे पेशंट लोक बिचारे खोळंबून बसले आहेत, त्यांचं काय? असं वागणं डॉक्टरांना शोभतं काय?...असा कोणता महत्त्वाचा ताप आहे की डॉक्टर त्याच्या वर्णनात एवढे गढून जावेत?...

मृणालला आता रहावलं नाही. तो उठला नि तडक दाराशी जाऊन त्याने टकटक केलं.

'कोण आहे? आत या.' डॉक्टर म्हणाले. तो दार उघडून आत गेला. मित्राला पाहताच ते पुढे म्हणाले,

"वा! मृणालदा तुम्ही? अन् दार वाजवायचं काय कारण? सरळ आत यायचं ते!"

आत जाताच दुसरा एक मित्र डॉक्टरांशी गप्पा करीत बसलेला मृणालला दिसला. मृणाल म्हणाला–

'खरं म्हणजे मला येऊन अर्धा तास झाला. पण तुम्ही कसल्यातरी तापाबद्दल चर्चा करीत होता तेव्हा त्यात व्यत्यय आणणं ठीक वाटलं नाही... जरा विचित्रच दिसतो, पण हा ताप नाही?... भारतात पण त्याची साथ आहे की काय?"

'हो तर!'

'खरंच?' मृणालच्या अंगावर शहारे आले.

'तुमच्या वैद्यकीय भाषेत त्याला काय म्हणतात?'

डॉक्टर म्हणाले, 'अजून त्या तापाला विशिष्ट नाव दिलं गेलेलं नाही. पण त्याचं नाव आहे–'Election Fever.'

मृणाल थक्क झाला. पण त्याला डॉक्टरांचा थोडा रागही आला. कारण बाहेर पेशंट तिष्ठत बसलेले असताना बेजबाबदारपणे भलत्याच विषयावर चर्चा करीत बसणं डॉक्टरांना शोभत नाही असं त्याला वाटलं. म्हणून तो म्हणाला–

'हे सगळं ठीक. पण म्हणून काय तुम्ही पेशंट्स् तिष्ठत ठेवावेत? त्यांना तपासणं हे तुमचं पहिलं कर्तव्य आहे ना?'

'कोण पेशंट्स्?...ते बाहेर बसलेले?... हं! ते पेशंट्स् नाहीत, प्रचारक आहेत.'

'प्रचारक?'

'होय. माझं मत मागण्यासाठी सहा पक्षांचे सहा प्रचारक आलेले आहेत, अन् मी त्यांना ही ट्रीटमेंट देत आहे.'

'ती कशी?' मृणालने विचारलं.

'त्यांना वाट पहायला लावून जरा वेळ स्वस्थ तरी बसतील. तेवढीच त्यांना विश्रांती मिळेल.'–डॉक्टर म्हणाले.

'वा! फारच छान!' मृणाल उद्गारला.

## साकमचा दुसरा वर्धापनदिन

साहित्य कलामंडळ ही मराठवाड्यातील ताज्या दमाच्या तरुण लोकांची एक प्रतिनिधिक संघटना असून तिचा दुसरा वर्धापनदिन नुकताच साजरा झाला. औरंगाबाद येथे साजऱ्या झालेल्या वर्धापनदिनी प्रा. भालचंद्र नेमाडे यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की कवी आणि लेखकांनी टीकाकारांच्यामार्फत प्रकाशकांकडे पोचण्याची प्रवृत्ति बंद करणे जरूर आहे. साहित्यिकांना आपले वैचारिक स्वातंत्र्य अबाधित राखून लिहिता येण्यासाठी स्वतःची प्रकाशन संस्था असली पाहिजे. प्रकाशन व्यवसायातील व्यक्तींनी लेखन मूल्यांची कदर केली पाहिजे. प्रस्थापितांविरुद्ध बंड (म्हणजे नेमके काय ?) करण्याची आवश्यकता प्रा. नेमाडे यांनी प्रतिपादन केली. प्रा. अहंकारी यांनी भाषण करताना अत्युच्च अभिव्यक्तिसाठी वाट पाहात रहाणे धोक्याचे असून तीव्रतेने जे वाटले, जाणवले ते सातत्याने लिहित राहावे. त्यातूनच लेखनातील जाण प्रगल्भ होते असे सांगितले. साहित्य संस्थातील रसिकांनी सर्व ठिकाणी अनिरूद्ध संचार करावा. कोणतेही राजकारण, धर्मकारण किंवा समाजकारण त्यात आणू नये असे श्री. सुखराम हिवराळे यांनी सांगितले. चर्चेमध्ये प्रकाशन–संस्थेवर भर देण्यात आला. 'रायटर्स पब्लिकेशन' संस्था सहकारी पद्धतीवर काढण्यासाठी 'साकम'ने त्वरित सक्रिय पावले उचलावीत यावर एकमत दिसले. पण 'सहकारी चळवळ' साहित्यिकांना कितपत झेपेल असा संशय माझ्यासारख्यांना वाटतो. 'साकम'च्या चालकांनी हा 'धाडसी' प्रयत्न यशस्वी केला तर माझ्यासारख्या अनेक संशयात्म्यांना त्यामुळे खेद होण्याऐवजी आनंदच होईल. 'साकम'चे अनेक कार्यकर्ते असून त्यात सर्वश्री बंकट पाटील, प्रभाकर म्हारोळकर, कमलाकर मिरचे, इंगळे, त्र्यंबक आसर, होडकर, गोसावी, मुलाटे आदींचा समावेश आहे.

## 'प्रजावाणी'चा पूर्णाकार प्रकाशन समारंभ

नांदेड येथून प्रसिद्ध होणारे दैनिक प्रजावाणी आता मोठ्या आकारात निघू लागले असून ७ फेब्रुवारीस पूर्णाकार प्रकाशन समारंभ झाला. श्री. वसंतराव काणे, ना. शंकरराव चव्हाण व आमदार बापूसाहेब काळदाते आदि प्रमुख मंडळी यासाठी आली होती. श्री. काळदाते यांनी याप्रसंगी मार्मिक भाषण करून अनेक महत्वपूर्ण सूचना दिल्या. जिल्हापत्रांनी केवळ जिल्ह्यापुरते पाहून चालणार नाही. जागतिक

राष्ट्रीय व प्रादेशिक विचार प्रवाहांचा परिचय करून देऊन वाचकांना मानसिक आंदोलनांची चाहूल माहीत करावी. तसेच पृष्ठ–मूल्य–कोष्टक निर्धारित करून जाहिराती संबधीचे वास्तववादी धोरण सरकारने आखावे असे सांगून जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्रांनी एकत्रित येऊन एक 'रोटरी' मशीन घेता आले तर तो प्रयोग करून पहावा असे त्यांनी सुचविले. समारंभाची सुरुवात पद्मश्री शामरावजी कदम यांच्या भाषणाने झाली. अत्यंत फटकळपणाने बोलण्याची त्यांची ख्याती आहे. नांदेडच्या विकास प्रश्नासंबंधी प्रजावाणीने कामगिरी बजावली आहे व त्याबद्दल त्यांनी संपादकांचे कौतुक केले. पण 'प्रजावाणी'चा एक 'अवगुण' आहे व तो म्हणजे प्रजावाणी अनेकदा वैयक्तिक निंदा नालस्ती करते हा अवगुण या दैनिकाने टाकून द्यावा असे परखडपणे श्री. कदम यांनी सांगितले. या 'अवगुणा'चे विधान नतरच्या वक्त्यांनीही उल्लेखिले. ना. शंकरराव चव्हाणांनी आपल्या भाषणात 'Dispassionate Thinking' करणारी वृत्तपत्रे हवीत. वृत्तपत्रांनी टीका जरूर करावी पण ती वस्तुनिष्ठ असावी असे आवाहन केले. प्रा. कुरुंदकर यांचेही भाषण झाले. श्री. वसंतराव काणे यांनी मराठी पत्रकार परिषद वृत्तपत्रांचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे असे सांगून मराठी पत्रकार ज्ञानात फार कमी पडतो, त्याची गुणवत्ता वाढविली पाहिजे व 'पत्रकार' होण्यासाठी किमान पात्रता निश्चित करता आली तर योग्य होईल असे सांगितले. श्री. सुधाकर डोईफोडे यांनी प्रास्ताविक भाषण केले. श्री. रामेश्वर बियाणी यांनी आभार मानले. नलिनी देशपांडे यांनी सुस्वर पसायदान व राष्ट्रगीत म्हटले. थंड पेय–पान झाल्यावर कार्यक्रम संपला. श्री. वसंतराव काणे यांनी दैनिक गोदातीर समाचार कार्यालयास भेट दिली. गोदातीरचे संपादक श्री. रसाळ यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. याप्रसंगी अनौपचारिक चर्चा होऊन पत्रकारामधील गटबाजी पत्रकारांच्या अडीअडचणी आदिसंबंधी बोलणे झाले. 'बहर'चे संपादक यावेळी उपस्थित होते.

## आर्थिक नियोजन व मनुष्यबळ

मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. वसंतराव पेठे यांचे नांदेडच्या यशवंत कोलेजात आर्थिक नियोजनावर माहितीपूर्ण भाषण झाले. आर्थिक विकास ही केवळ यांत्रिक प्रक्रिया (मेकॅनिकल प्रोसेस) नसून संख्याशास्त्रीय सूत्राने प्रगती घडत नाही त्यासाठी देशातील लोकांची मनोवृत्ती विकासाभिमुख करावी लागते. मनुष्यबळाच्या योग्य वापराकडे योग्य ते लक्ष न दिल्याने पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत अनुक्रमे सुमारे १५, २५ व ३५ दशलक्ष लोक बेकार राहिले असे त्यांनी सांगितले. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याची व दैववादी वृत्ती टाकून देण्याची गरज प्रतिपादून प्रा. पेठे यांनी विकासाची आचारसंहिता (code of conduct for economic development) भारतात

सारखी भंग होत आहे, याबद्दल चिंता व्यक्त केली.

जर्मनी, जपान व इस्रायल येथील लोक मेहनती व राष्ट्रप्रेमी असल्याने त्यांनी अल्पावधीत आश्चर्यजनक प्रगती घडवून आणली पण भारताची परिस्थिती वेगळी आहे. राष्ट्रापेक्षा समूहनिष्ठा (Tribal psychology of Indians) आपल्या देशात अधिक बलवत्तर आहे, जन्मनिष्ठ जातिव्यवस्था आणि शहरामधील वाढते आंदोलनात्मक मार्ग यामुळे विकासाला अपेक्षित गती मिळत नाही असे सांगून प्रा. पेठे यांनी काही आंकडेवारी सादर केली.

प्रा. पेठे पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटमध्ये होते. शिकागो व हारवर्ड विद्यापीठाचे ते व्हिजिटींग स्कॉलर राहिले असून त्यांनी आर्थिक विषयावर विपुल लेखन केले आहे. प्राचार्य म्हैसेकर यांनी मार्मिक समारोप केला. नियोजन चर्चा मंडळातर्फे प्रा. पेठे यांचे स्वागत करण्यात आले.

## लातूरच्या आर्य परिषदेतर्फे हुतात्मादिन

लातूर येथे प्राचार्य पुरोहित यांच्या अध्यक्षतेखाली आर्य परिषदेतर्फे हुतात्मा-दिन पाळण्यात आला. प्राचार्य जे. एस. वाघमारे ह्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून भाषण करताना स्वातंत्र्य सैनिकांच्या आशा आकांक्षा स्वातंत्र्य प्राप्तीनंतर २३ वर्षे होऊनही अद्याप अपूर्णच राहिल्या आहेत असे सांगितले. आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा फुले, आगरकर, आंबेडकर, राम मोहन रॉय यांनी सामाजिक परिवर्तनाचे आव्हान स्वीकारले पण आज हे कार्य मंदगतीने होत आहे. विज्ञानाची कास धरून सुबत्तानिर्मितीचा विचार केल्याशिवाय नवसमाज निर्माण करता येणार नाही असे सांगून 'महारवाडे' नष्ट होऊन त्यांची वस्ती गावात झाली पाहिजे असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. मानवता केंद्र बिंदु मानून कार्य केले तरच देशात समानता आणि समृद्धी येईल, अन्यथा आजची परिस्थिती कायम राहील. सत्तांधतेचा काळोख आज पसरला असून स्वातंत्र्योत्तर विविध अनिष्ट प्रवृत्ती बळावत असल्याबद्दल प्रा. वाघमारे यांनी खेद व्यक्त केला. महाभारत काळात एकलव्य आणि कर्णाला मिळालेली वागणूक 'आदर्श' नव्हती असे सांगून दगडाचे पूजक न बनता मानवाचे पूजक आपण बनले पाहिजे असे शेवटी प्रा. वाघमारे यांनी आवाहन केले.

## निवडणूक प्रचाराचा धुराळा

इतर ठिकाणाप्रमाणेच नांदेड जिल्ह्यातही मुदतपूर्व लोकसभा निवडणूकीचा धुरळा उडत आहे. जीप्स धावत आहेत, जाहीर भाषणे व प्रचार पत्रके यांचा 'मारा' होत आहे. परस्परविरोधी घोषणा चालू आहेत. पंतप्रधान इंदिरा गांधी नांदेडला येऊन गेल्या. 'मोठे साहेब' लवकरच येत आहेत. नांदेडमध्ये नव-

काँग्रेसचे श्री. तरोडेकर व रिपब्लिकन पक्षाचे श्री. भय्यासाहेब आंबेडकर यांच्यात खरी लढत आहे. जनसंघाचे श्री. गंजेवार व अपक्ष श्री. वाघमारे हेही निवडणुक रिंगणात उतरले आहेत. जनसंघाचा प्रचार नेहमीप्रमाणेच शिस्तबद्ध व योजनापूर्वक आहे. परस्परविरोधी घोषणाचे युद्ध चालू आहे.

□ "इंदिरा गांधी आई है, नयी रोशनी लायी है"

"इंदिरा गांधी आयी है, नोटोंके बंडल लायी आहे" अशा घोषणा तसेच या निवडणुका म्हणजे देशभक्त व देशद्रोही यांच्यातील लढा आहे असे 'बडी युति'-वाले म्हणत आहेत तर हा लढा पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी असल्याचे काँग्रेस सांगत आहे. डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव श्री भैयासाहेब यांची प्रचार पातळी मात्र उच्च दर्जाची आहे. या निवडणूक रणधुमाळीचा मतदानाच्या दृष्टीने खरोखरच काही उपयोग आहे काय असा प्रश्न पुष्कळदा पडतो. बहुतेकांची 'मते' व म्हणून निवडणुकीत होणारे मतदान 'ठरलेले' आहे. पण जे मार्जिनवर आहेत त्यांच्यावर ह्या प्रचाराचा काहीसा परिणाम होतो. मराठवाड्यात बव्हंशी नवकाँग्रेसच विजयी होणार हे 'भविष्य' वर्तविण्यास ज्योतिषी नको !

## हालहवाल संबंधी थोडेसे

'माणूस' द्विसाप्ताहिकातून मराठवाड्याची हालहवाल (किंवा हालचाल) हे सदर सुरू केल्यानंतर अनेकांची मला पत्रे आली व प्रत्यक्ष भेटीत काहींनी त्याबद्दल चर्चा केली. नांदेड व औरंगाबादचा परामर्शच प्रामुख्याने मी घेतो असे बहुतेकांचे मत पडले. थोडेफार ते बरोबरही आहे पण याचे मुख्य कारण म्हणजे सदर हालहवालीमध्ये सर्वत्र मराठवाड्यातील घटनांचे वृत्तसंकलन देणे हा मुख्य हेतू नाही. वैशिष्टयपूर्ण व महत्वाच्या घटना प्रवाहांचा शक्य तितक्या निःपक्षरीतीने व थोडेसे खोलात जाऊन विवेचन करावे हा मर्यादित हेतू या सदराचा आहे. सर्वच वैशिष्टयपूर्ण आणि महत्त्वाच्या घटनांसंबंधी लिहिणेही स्थलाभावी व वेळेअभावी शक्य होणारे नाहीच. सामान्यतः औरंगाबाद, नांदेड, जालना, लातूर, परभणी आदी ठिकाणचा परामर्श घेता येतो. बाळापूर, विनगाव, सास्तूर, नायगाव सारख्या छोटया छोटया खेडयातील घटनांचाही परामर्श घ्यायचा म्हटले तर तशा घटना तेथे घडतातच असे नाही व त्यावेळी तेथे जाता येईलच असेही नाही. पण आधी सूचना दिल्यास या याबतीतही काही करता येऊ शकेल. अनेकांच्या अनेक अपेक्षा असू शकतात. त्या समजल्या म्हणजे त्यातील निदान काही वास्तव अपेक्षांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करता येईल एवढेच आश्वासन देतो. निवडणूक काळातील हे आश्वासन असले तरी ते 'त्या' प्रकारचे नाही. □ □ □

# इंडिकेट राज्यातील चित्र

वा. दा. रानडे

इंदिरा काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यांपैकी महाराष्ट्रातील निवडणूक परिस्थितीचे सविस्तर विश्लेषण गेल्या अंकात केले. आता इतर राज्यातील परिस्थितीचा विचार करावयाचा आहे.

### मध्यप्रदेश

मध्यप्रदेशात खरी लढत सत्तारूढ काँग्रेस आणि जनसंघ–संस्थानिक युति यांच्यात आहे. विधानसभेच्या एकूण ३७ जागांपैकी ३३ जागांबाबत सिंडिकेट आघाडीतील घटक पक्षात एकमत झाले. या आघाडीला संस्थानिकांचा पाठिंबा आहे. पण या आघाडीचे बळ भासविण्यात येते तेवढे नाही. सिंडिकेट आघाडीत जनसंघ हाच प्रमुख पक्ष. सिंडिकेट काँग्रेस व स्वतंत्र पक्षाला मध्यप्रदेशात काही स्थान नाही. संयुक्त समाजवादी पक्षाचे काही थोड्या भागात वजन आहे. पण काही जागांबाबत त्याचे आघाडीशी मतभेद झाले असून चार मतदारसंघात आघाडीतील घटक पक्षात आपसात लढती होणार आहेत, तेथे मते विभागल्याचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळेल.

जनसंघ–संस्थानिक युति काही आताच स्थापन झालेली नाही. राज्यातील पोट-निवडणुकांच्या वेळीच ही युति झालेली होती. ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे जनसंघाला मिळाल्याने युतीला अधिक बळकटी आली. पण पोटनिवडणुकात या युतीचा प्रभाव पडला नाही. नऊपैकी आठ पोटनिवडणुका इंदिरा काँग्रेसने जिंकल्या, जनसंघाने संस्थानिकांशी केलेल्या युतीमुळेच त्याचा पोटनिवडणुकात पराभव झाला. संस्थानिकांची संगत जनसंघाने सोडावी असा सल्ला पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी दिला. पण जनसंघाच्या नेत्यांना तो मानवला नाही. संस्थानिकांच्या पाठिंब्याने काही थोड्या जागा जनसंघाला जास्त मिळतील पण सिंडिकेट आघाडी बहुसंख्य जागा मिळवू शकेल असे वाटत नाही.

याचा अर्थ इंदिरा काँग्रेसला बहुसंख्य जागा सहज मिळतील असे नाही. इंदिरा

काँग्रेसमध्ये तीन गट आहेत. एक मुख्यमंत्री शुक्लांचा, दुसरा माजी मुख्यमंत्री व्दारका प्रसाद मिश्रांचा आणि तिसरा काठावरच्या संधिसाधूंचा. त्यांच्यात एकजूट राहिली तरच इंदिरा काँग्रेसला बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता आहे. इंदिरा कोणाशीही समझोता न करता निवडणूक लढवीत आहे. प्रजासमाजवादी व कम्युनिस्ट पक्षाने निवडणुकीसाठी छोटी आघाडी बनविली आहे. पण या पक्षांचा मध्य प्रदेशच्या राजकारणात फारसा प्रभाव नाही. गेल्यावेळी त्यांना लोकसभेची एकही जागा मिळाली नव्हती.

मध्य प्रदेशात गेल्यावेळी लोकसभेच्या एकूण ३७ जागांपैकी २४ काँग्रेसने जिंकल्या होत्या. जनसंघ १०, स्वतंत्र पक्ष १ व अपक्ष २ असे इतर पक्षांचे बळ होते. गेल्यावेळी १७४ उमेदवार उभे होते. यावेळी १७० म्हणजे जवळजवळ तेवढेच आहेत. होशंगाबाद, बेतूल व कांकेर या फक्त तीन मतदारसंघात सरळ सामने होणार आहेत. होशंगाबाद मध्ये गेल्यावेळीही सरळसामना झाला होता व त्यात काँग्रेस उमेदवाराने २२ हजारांवर मतांनी विजय मिळविला होता. बेतूलमध्ये गेल्यावेळी तिरंगी लढत होती व काँग्रेसने ती जागा १३ हजारावर मतांनी जिंकली होती. कांकेरची आदिवासी राखीव जागा चौरंगी सामन्यात जनसंघाने गेल्या वेळी फक्त ३५०० मतांनी जिंकली होती. हा सामना यावेळी अत्यंत चुरशीचा होईल.

काँग्रेसने १६ जागा गेल्या वेळी ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या होत्या. त्यापैकी रेवा, सुरगुणा, बस्तर, झाबुआ या चार मतदारसंघात आज सिंडिकेट आघाडीत असलेल्या घटक पक्षांची एकत्रित मते काँग्रेसपेक्षा जास्त होती. या जागा सिंडिकेट आघाडीस यावेळी मिळण्याची शक्यता आहे. तरीही बहुसंख्य जागा मिळविणे सिंडिकेट आघाडीस कठीण जाईल. इंदिरा काँग्रेसला पूर्वीपेक्षा थोड्या कमी जागा मिळतील पण बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता आहे.

## आंध्र प्रदेश

आंध्रमधील निवडणुकीत यावेळी तेलंगणच्या प्रश्नास प्राधान्य येणार आहे. एकूण ४१ जागांपैकी १४ तेलंगणमध्ये आहेत. त्यापैकी बऱ्याच जागा सत्तारूढ काँग्रेस गमवण्याचा संभव आहे. तेलंगण प्रश्नावर तेलंगण प्रजासमितीच्या नेत्यांशी समझोत्याचे प्रयत्न इंदिरा गांधींनी केले होते. पण ते अयशस्वी झाले. कम्युनिस्टांना दोन व मार्क्सवाद्यांना दोन जागा देण्याची इंदिरा काँग्रेसची तयारी होती पण त्यांनी अधिक जागांची मागणी केल्याने समझोता झाला नाही.

तेलंगण भागात इंदिरा काँग्रेसने जागा गमावल्या तरी त्या सिंडिकेट आघाडीस मिळण्याची शक्यता नाही. कारण आघाडीतील घटक पक्षांपैकी स्वतंत्र पक्ष व सिंडिकेट काँग्रेसचा तर या भागात काहीच प्रभाव नाही. जनसंघ व संयुक्त समाजवादी यांचा काही थोड्या भागात प्रभाव आहे. या १४ जागांपैकी बहुसंख्य जागा तेलंगण प्रजासमितीलाच मिळण्याची शक्यता आहे.

आंध्र भागात याच मुख्यमंत्री ब्रह्मानंद रेड्डींनी आपली व आपल्या पक्षाची बाजू बळकट केली आहे. त्यांच्या सत्तेचा मुख्य आधार म्हणजे जिल्हा परिषदा व पंचायत समित्या. या राज्यात एकवीस जिल्हा परिषदा आहेत. त्या सर्वांचे अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डींची माणसे आहेत. राज्यातील २२८ पंचायत समित्यांपैकी बारापेक्षा अधिक समित्या विरोधी पक्षांना जिकता आलेल्या नाहीत.

सिंडिकेट आघाडीपैकी रंगा व लचण्णा यांच्या वैयक्तिक वजनामुळे स्वतंत्र पक्षाला श्रीकाकुलम, गुंतूर, ओंगोल व चित्तूर जिल्ह्यात चांगला आधार आहे पण किनारपट्टीच्या जिल्ह्यात इंदिरा कांग्रेसचाच प्रभाव आहे. या भागात सिंडिकेट कांग्रेसच्या नेत्यांनी प्रचारासाठी गेल्या वर्षी तीनदा दौरा केला पण प्रत्येक जिल्ह्यात पूर्वी त्यांनीच तयार केलेले पुढारी इंदिरा कांग्रेसला मिळाल्याचे त्यांना आढळून आले. अलिकडे झालेल्या दोन पोटनिवडणुका इंदिरा कांग्रेसने अगदी सहज जिकल्या. निवडणुकीच्या सुमारासच व्यंकट सुब्य्या यांच्यासारखा सिंडिकेटचा मोहरा इंदिरा कांग्रेसने आपल्या बाजूस वळविला. वैश्य मते मिळविण्यास त्यांचा उपयोग होईल.

गेल्या निवडणुकीत कांग्रेसने ४१ पैकी ३५ जागा जिंकल्या होत्या. स्वतंत्र पक्ष २, कम्युनिस्ट १ व अपक्ष २ अशी इतर पक्षांची विभागणी होती. शेकडा मतदान कांग्रेस ४५.८६, स्वतंत्र पक्ष १३.७५, जनसंघ १.४४ संयुक्त समाजवादी ०.४२, कम्युनिस्ट १२.६१, मार्क्सवादी ६.२०, प्रजासमाजवादी ०.१७, रिपब्लिकन पक्ष ०.५०, अपक्ष १८.०८ टक्के याप्रमाणे झाले. दोन्ही कम्युनिस्ट पक्षांची एकत्रित मते स्वतंत्र पक्षापेक्षाही जास्त होती पण ती विभागली. त्यामुळे कम्युनिस्टांना फक्त एक जागा मिळाली. यावेळी तीच परिस्थिती कायम आहे. गेल्या वेळी १८५ उमेदवार उभे होते. यावेळी २०७ उभे आहेत. त्यांची पक्षवार विभागणी पुढीलप्रमाणे : इंदिरा कांग्रेस ३७, सिंडिकेट कांग्रेस ११, स्वतंत्र पक्ष १०, जनसंघ ६, संयुक्त समाजवादी १, तेलंगण प्रजासमिती १४, तेलंगण कांग्रेस ७, कम्युनिस्ट ११, मार्क्सवादी ५, रिपब्लिकन खोब्रागडे गट ५, मायनॉरिटीज अँड लेबरपार्टी ५, अपक्ष ९४. अपक्ष उमेदवार गेल्यावेळी ६१ उभे होते. यावेळी ३३ ने वाढले आहेत. जास्त उमेदवार उभे असल्याचा फायदा इंदिरा कांग्रेसला मिळून गेल्या वेळेइतक्या जागा जरी तिला मिळाल्या नाहीत तरी बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता आहे.

## आसाम

आसाममध्ये यावेळी लोकसभेच्या १४ जागा १८ पक्ष लढवीत आहेत. राष्ट्रीय पक्षांबरोबर दोन प्रादेशिक पक्ष लोकसभा निवडणुकीत प्रथमच उतरले आहेत. इंदिरा कांग्रेस कोणाशीही समझोता न करता १४ पैकी १३ जागा लढवीत आहे. फक्त एक जागा उपसभापती स्वेल यांच्यासाठी मोकळी ठेवली आहे. सिंडिकेट आघाडी सर्व १४ जागा लढवीत आहे. तिसरी आघाडी कम्युनिस्ट व प्रजासमाजवाद्यांची. ते तेरा जागा लढवीत आहेत. या तीन आघाड्यात इंदिरा कांग्रेसचाच

जोर अधिक आहे. कॉंग्रेसने गेल्या वेळी १३ पैकी ९ जागा जिंकल्या होत्या. इतर ४ जागांमध्ये २ प्रजासमाजवाद्यांना, १ कम्युनिस्टांना व १ डोंगरी परिषदेला मिळाली होती. सिंडिकेट आघाडीतील स्वतंत्र पक्ष, जनसंघ आणि संयुक्त समाजवादी यांना एकही जागा मिळाली नव्हती. प्रादेशिक पक्षांपैकी पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी ८ व स्वतंत्र अहोम राज्याची मागणी करणारी अहोमताई मोंगोलिया रैया परिषद ४ जागा लढवीत आहेत. त्यांना एकही जागा मिळाली नाही, तरी त्यामुळे मते विभागली जाऊन सत्तारूढ कॉंग्रेसला त्याचा फायदा मिळेल व गेल्या वेळे-एवढ्या जागा मिळाल्या नाहीत तरी बहुसंख्य जागा इंदिरा कॉंग्रेस मिळविण्याची शक्यता आहे.

## राजस्थान

राजस्थानमध्ये लोकसभेच्या २३ जागांसाठी १२९ उमेदवार उभे आहेत. गेल्या-वेळी ११६ होते. इंदिरा कॉंग्रेस सर्व जागा लढवीत आहे. इतर पक्षांचे उमेदवार पुढीलप्रमाणे. स्वतंत्र पक्ष ८, जनसंघ ७, सिंडिकेट कॉंग्रेस ४, भारतीय क्रांतिदल ६, मार्क्सवादी ३, संयुक्त समाजवादी २, कम्युनिस्ट १, प्रजासंघर्ष समिति १, अपक्ष ७४. अपक्ष उमेदवार गेल्यावेळी ६४ होते. गेल्यावेळी कॉंग्रेसने १०, स्वतंत्र पक्षाने ८, जनसंघाने ३ व अपक्ष उमेदवारांनी २ जागा जिंकल्या होत्या. सिंडिकेट आघा-डीस यावेळी संस्थानिक व उद्योगपतींचा पाठिंबा असून त्यांच्याशी सामना देणे इंदिरा कॉंग्रेसला जड जाणार आहे. कॉंग्रेसमधील फुटीचा राजस्थानवर काही परि-णाम झालेला नसून सिंडिकेट कॉंग्रेस तेथे मूळ धरू शकलेली नाही. सिंडिकेट आघा-डीत भारतील क्रांतिदलास सामील करून घेण्याचे प्रयत्न फसले. हा पक्ष ६ जागा लढवीत आहे. त्यामुळे तेथे मते विभागली जाऊन त्याचा फायदा इंदिरा कॉंग्रेसला मिळेल. राजस्थानात कॉंग्रेसने काही जागा संस्थानिकांच्या पाठिंब्याने जिंकल्या होत्या. उदेपूरच्या नरेशांनी गेल्यावेळी कॉंग्रेसला पाठिंबा दिला होता व जोधपूरचे नरेश तटस्थ होते. यावेळी सर्वच संस्थानिकांचा इंदिरा कॉंग्रेसला संघटित विरोध आहे.

झालवाड व उदेपूर या दोन मतदारसंघात सरळ सामने होणार आहेत. गेल्या-वेळी जनसंघाने झालवाडची जागा कॉंग्रेसपेक्षा ८१ हजारावर जास्त मते मिळवून जिंकली होती. त्यावेळी तिरंगी सामना होता. ही जागा यावेळीही जनसंघाला मिळण्याची शक्यता आहे. उदेपूरच्या जागेसाठी गेल्या वेळीही सरळ लढत होती. कॉंग्रेसने ही जागा स्वतंत्र पक्षापेक्षा ६५ हजारावर मते मिळवून जिंकली होती पण दोन वेळच्या परिस्थितीतील एक महत्त्वाचा फरक म्हणजे उदेपूरचे नरेशांचा त्या-वेळी कॉंग्रेसला पाठिंबा होता. यावेळी विरोध आहे. त्यामुळे ही जागा इंदिरा कॉंग्रेस गमावण्याचा संभव आहे. गेल्यावेळी सहा जागा कॉंग्रेसने ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या होत्या. अलवार मतदारसंघात संयुक्त समाजवादी व स्वतंत्र-पक्ष यांची एकत्रित मते गेल्या वेळी कॉंगेसपेक्षा जास्त होती. यावेळी त्यांनी आघाडी

केल्याने ही जागा त्यांना मिळण्याचा संभव आहे. सर्व २३ जागांबाबत सिंडिकेट आघाडीत एकमत झाल्याची बातमी होती पण बन्सवाडा, बारमेर व गंगानगर या तीन मतदारसंघात सिंडिकेट कॉंग्रेसने समझोता मोडून आपले उमेदवार उभे केले. आहेत. सिंडिकेटने समझोता मोडला. आता अजमीरमधील सिंडिकेट उमेदवाराला पाठिंबा द्यावयाचा की नाही याचा फेरविचार संयुक्त समाजवादी पक्ष करीत आहे. संस्थानिकांचा संघटित पाठिंबा सिंडिकेट आघाडीस असल्याने इंदिरा कॉंग्रेसला बहुसंख्य जागा मिळविणे यावेळी सोपे नाही हे खरे पण आघाडीतील हे अंतर्गत संघर्ष, भाक्रांदच्या उमेदवारांमुळे विभागली जाणारी मते या गोष्टी लक्षात घेता सिंडिकेट आघाडीलाही बहुसंख्य जागा जिंकणे सोपे जाणार नाही.

## हरियाना

हरियानामध्ये सबंध ग्रामीण भागात विद्युतीकरणाचा कार्यक्रम बन्सीलाल सरकारने प्रथम पुरा करून देशात आघाडी मिळविली. उपसा जलसिंचन योजनाही वेगाने पुऱ्या केल्या. मते मिळविण्यास याचा चांगला उपयोग होईल असे इंदिरा कॉंग्रेसला वाटते पण आर्थिक प्रगतीपेक्षाही जातीय आवाहनाचा पगडा हरियानाच्या मतदारांवर अधिक आहे. भगवत दयाळ शर्मा यांच्यासारख्या सिंडिकेट आघाडीच्या


# साम्य आणि मुक्त निवडणुकीसाठी

सार्वत्रिक निवडणुकीत मतदान शांततेने, मोकळ्या वातावरणात व न्याय्य पद्धतीने व्हावे म्हणून सर्व प्रकारची व्यवस्था करण्यात येत आहे. मतदारांना धाकदपटशा दाखविणे किंवा दुसऱ्याच्या नावावर मतदान करणे या गुन्ह्यांबद्दल जबर शिक्षा देण्यात येईल.

तुमचा मतदानाचा हक्क न भिता व पक्षपात न करता बजवा. तुमचे मत गुप्त आहे.

हिंसेला घाबरू नका शूर बना आणि हिंसेला विरोध करा. मतदान करताना कोणताही मोबदला किंवा अमिष घेऊ नका.

तुमचे मतदान केंद्र जवळच आहे. उमेदवार किंवा त्याच्या एजंटांची वाहने वापरू नका.

**एक प्रौढ नागरिक या नात्याने मतदान करणे हे तुमचे पवित्र कर्तव्य आहे. हे लक्षात ठेवा.**

एस. पी. सेन वर्मा
भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त

davp 70/617

मरव्वी नेत्यांना जातीचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हे तंत्र चांगले अवगत आहे. राज्यात २० टक्के लोक जाट असून राजकीयदृष्ट्या ते सर्वात जास्त जागरूक आहेत. निवडणुकीच्या ऐन मोक्याला इंदिरा काँग्रेसमधील एक प्रमुख जाट नेते देवीलाल फुटले. हिस्सार, सिर्सा व कैथाळ मतदारसंघातील जाटांवर त्यांचा बराच प्रभाव आहे. त्यापैकी हिस्सारची जागा काँग्रेसने गेल्यावेळी अवघ्या सात हजार मतांनी जिंकली होती, ती यावेळी जिंकणे कठीण जाईल. अहिर जमात १० टक्के आहे. मोहिंदरगड व हिस्सार जिल्ह्यात त्यांची वस्ती बरीच असून विशाल हरियाना पक्षाचे नेते राव बीरेंद्रसिंग यांचे त्या भागात चांगले वजन आहे. हरिजन वीस टक्के आहेत. अंबाला राखीव जागा हरिजनांची आहे. गेल्यावेळी ती जनसंघ ने आठ हजार मतांनी जिंकली. हरिजनांवर बराच प्रभाव असलेले नेते चंडराम यांना इंदिरा काँग्रेसमध्ये आणून या जागेसाठी उभे करावे असा एक प्रयत्न होता. पण मुख्यमंत्री बन्सीलाल यांनी त्यास विरोध केला. गेल्या वेळेप्रमाणेच यावेळीही ही जागा जनसंघ जिंकण्याचा संभव आहे.

हरियानात लोकसभेच्या सर्व ९ जागा इंदिरा काँग्रेस लढवीत आहे. सिंडिकेट काँग्रेस ४, जनसंघ ३, विशाल हरियाना पक्ष ३, रिपब्लिकन पक्ष ३, भारतीय क्रांती दल २, प्रजासमाजवादी २ असे इतर पक्षांचे उमेदवार आहेत. एकाही जागेसाठी सरळ सामना नाही. दोन जागांसाठी चौरंगी सामने असून इतर जागांसाठी त्यापेक्षाही अधिक उमेदवार उभे होते. यामुळे मते विभागली जाऊन इंदिरा काँग्रेसला पूर्वीइतक्या ७ जागा जरी मिळाल्या नाहीत तरी बहुसंख्य जागा मिळविणे अवघड जाणार नाही.

## काश्मीर

काश्मीरमध्ये निवडणुकीच्या ऐन मोक्यालाच पाक हेरांचा कट उघडकीस आला व सार्वमत आघाडीस बंदी करण्यात आली. तिचे नेते शेख अब्दुल्ला व बेग यांना काश्मीर प्रवेशास बंदी करण्यात आली. निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला जाणवण्यासारखा विरोध सार्वमत आघाडीकडूनच झाला असता. इंदिरा काँग्रेसच्या मानाने इतर पक्षांचे वजन फार कमी आहे. नॅशनल कॉन्फरन्सचा पाठिंबा मिळवून इंदिरा काँग्रेसने आपली बाजू आणखी मजबूत केली. जम्मू भागात जनसंघाचा जोर असला तरी विजय मिळविण्याएवढा नाही. यावेळी ६ जागांसाठी १७ उमेदवार उभे आहेत. फक्त लडाकच्या जागेसाठी सरळ सामना होईल. इंदिरा काँग्रेस सर्व जागा जिंकण्याची शक्यता आहे.

असे हे इंदिरा काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यातील निवडणुकीचे चित्र आहे. राजस्थान सोडला तर या राज्यांपैकी बाकी सर्व राज्यात काँग्रेस पूर्वीइतक्या नसल्या तरी बहुसंख्य जागा मिळविण्याचा संभव आहे. पण या राज्यातून पूर्वीपेक्षा कमी जागा मिळाल्या तर इंदिरा काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळण्याची शक्यता नाही.

□ □ □

सहा-सव्वासहाची वेळ होती. संभाजी पुलावरून मी भरधाव वेगाने चाललो होतो. ऑफिसमधून बाहेर पडूनही बराच वेळ झाला होता. पण मित्रांशी गप्पा मारण्याच्या नादात तिकडे लक्ष गेलं नव्हतं. घरी लवकर यायचं हे घोकूनसुद्धा शेवटी उशीरच झाला होता. तेव्हा मोहना चिडणार ह्यात शंकाच नव्हती. खर म्हणजे कामाच्या गडबडीत मी पार विसरून गेलो होतो!

स्कूटरचा वेग वाढविला आणि हिंदविजयपाशी आलो तेवढ्यात 'माधवऽ माधव' कोणीतरी हाक मारल्याचा भास झाला. लक्षच द्यायचं नाही असा निश्चय करून सरळ गोखले चौकाकडे वळलो. क्षणभर वाटलं की सुटलो, पण तसं व्हायचं नव्हतं!

अचानकपणे माझ्या स्कुटरपुढे येऊन कोणीतरी हात पसरले! आता ही व्यक्ती मरणारच ह्या विचाराने क्षणभर मला काही सुचेनाच! दुसऱ्याच क्षणी "काय रे, मरायचं काय तुला" म्हणून मी स्कुटरचे ब्रेक दाबले! केवळ त्याचे दैव बलवत्तर म्हणूनच तो वाचला!

"मित्रा, माझी एक विनंती आहे." त्याने हसत हसत खांदे उडविले.

# पार्टी!!

**सुभाष देशपांडे**

क्षणापूर्वी आपला प्राण किती धोक्यात होता याची अस्पष्टशी जाणीवही त्याच्या आवाजात नव्हती.

"म्हणजे?" मी आश्चर्याने उद्गारलो.

"मरण! हं!" त्याने निर्जीव सुस्कारा टाकला. मला त्याच्या बोलण्याचं कमालीचे आश्चर्य वाटलं. क्षणभर मी त्याच्याकडे पाहिलं आणि खरंच वाटेना. "कोण सुरेंद्र..." मी आश्चर्याने उद्गारलो!

"होय सुरेंद्र. तुझा जानी दोस्त!" त्याने माझे खांदे घुसळले

सुरेंद्रची आणि माझी कॉलेजपासून मैत्री होती. दोघांनाही नाटक-सिनेमाचा शौक!

"अरे, तुझे लक्ष कुठंय?" सुरेंद्र मला हलवित म्हणाला.

"अं...अं...फार खराब झालास तू सुरेंद्र"

"त्याचे काय विशेष" त्याने पुन्हा खांदे उडविले!



" खरंच, मी तुला ओळखूही शकलो नाही!" माझ्या डोळ्यासमोर त्याची कॉलेजमधली रूबाबदार मूर्ती उभी राहिली. सहा फूट उंच, गोरापान, नाकेला, डोक्यावरची जुल्फ उडवणारा, घाऱ्या डोळ्याचा सुरेंद्र आमच्या कॉलेजचा एकमेव हिरो होता. भावी आयुष्यात तो एखादा प्रसिद्ध नट निश्चितच होणार हे त्यावेळचं आमचं भाकीत होतं!

" आजचं आमंत्रण लक्षात राहिलं ना?" त्याने पुन्हा माझी तंद्री मोडली.

" आमंत्रण...कसलं?"

" हो! माझ्या लग्नाचा वाढदिवस आहे आज! साडेसात वाजता बंगल्यावर यायचं...पार्टी अॅरेंज केली आहे. येशील ना?" त्याचा स्वर आर्जवी होत गेल्या- सारखा मला वाटला.

" हो! येईन की!"

माझ्या होकाराने त्याचे डोळे चमकले! पण दुसऱ्याच क्षणी माझ्या हाताचा पंजा आपल्या दोन्ही हातात प्रेमभराने दाबून " जरूर या " असं म्हणून तो ताड्-ताड् निघूनसुद्धा गेला.

त्याच्या ह्या विक्षिप्त वागण्याने क्षणभर मी स्तब्ध होऊन त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघतच राहिलो. अपघाताची तमाही न बाळगता धुमकेतूसारखा हा आला काय.. पार्टीचे आमंत्रण देऊन लागलीच निघून गेला काय...छे! सारच अजब होतं!

एकाच विद्यापीठातून आम्ही एम. ए. झालो आणि आश्चर्य म्हणजे एकाच ऑफिसमध्ये दोघं नोकरीला लागलो. जेमतेम एका वर्षातच त्याने आपला रजिस्टर-पद्धतीने विवाह ठरल्याची बातमी देऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. या अगोदर त्याने मलासुद्धा कसलाही पत्ता लागू दिला नव्हता. अर्थातच मी त्याच्यावर चिडून त्याचे अभिनंदनही केले नव्हते. उलट शेलक्या शब्दांनी संभावनाच केली होती!

" सुरेंद्र हा तुझा मित्रद्रोह आहे. "

" अरे पण..."

" काही सांगू नकोस. " मी निघून जाऊ लागलो.

" माधव, तुला खरंच आश्चर्य वाटेल! मागच्या आठवड्यात प्रथम मी तिला पाहिलं. नाटकाच्या तालमीच्या वेळी तिची ओळख झाली. पुढे नाटक कॅन्सल झालं..."

" आणि तुमचं पक्कं झालं!"

" म्हणजे अगदी आय केम–आय सॉ–ऑय कॉन्कर!" मी उपरोधाने म्हणालो.

" माधव...माधव. "

" अगदी गुलामच केलं की तुला...बरं पण नाव काय?"

" बंगल्यावर येऊन विचार!" म्हणून तो तरातरा निघून गेला!

पुढे मला वेळ झाला नाही आणि त्यानेही महिन्याची रजा काढल्याचे समजले. सुनेत्रा नावाच्या कोणा नवोदित नटीशी त्याचा विवाह ठरल्याचे मात्र माझ्या कानावर आले! त्याची मात्र भेट झाली नाही.

एक दिवस अचानक रस्त्यात गाठ पडली, तेव्हा त्याने एका तरुणीशी ओळख करून दिली! पावडरीचा भपकारा आला – खरोखरच ती एखाद्या नटीसारखी दिसत होती. रंगवलेले लाल ओठ – कुरळ्या बटा – मादक काळेभोर गहिरे डोळे आणि स्वैर सोडून दिलेला रेशमी पदर!

" नमस्ते " म्हणून मी तेथून निघालो!

तिचं ते बोलणं...हसणं–उभं रहात ते स्टायलिश झुकणं मला तितकं आवडलं नाही.

त्यानंतर आठ दिवसांनी त्याच्या लग्नाची पार्टी झाली! बरीच मंडळी उपस्थित असल्याचं वाचलं. फोटोही होताच! मला मात्र पार्टीला जाणं जमलं नाही.

पार्टीच्या आदल्या दिवशीच मुंबईला माझ्या लग्नाचा साखरपुडा होता आणि साखरपुड्यानंतर तब्बल दोन दिवस मोहनाबरोबर मी आख्ख्या मुंबईभर गरागरा फिरलो. मोहनाच्या नाजुक आणि लाघवी शब्दातील आर्जवांना विरोध करणं जमलं नाही मला !

परत आलो तो दुसऱ्याच दिवशी शेजारच्या मांडके मावशी समोर हजर ! म्हणाल्या–

"अरे माधव, तुझा तो कोण मित्र, त्याच्याकडून परवा दहा–बारा वेळा फोन आला आमच्याकडे ! माधव आला का म्हणून विचारत होता सारखा ! त्याचं लग्न सोडून गेला होतास कुठे ?"

माझी तंद्री लागलेली पाहून "काय हा लहरीपणा" असं काहीसं पुटपुटत त्या निघून गेल्या.

त्यानंतर घटनाही अनेक घडल्या.

पंधरा दिवसांनी माझा विवाह झाला. ते दोघे लग्नाला आले होते. त्यांच्याबरोबर लक्ष्मीनारायण नावाचे एक मद्रासी दिग्दर्शकही आले होते. ओळख नसताना त्याने मला प्रेझेंट दिले होते. श्रीमंत असूनही माणूस मोठा सालस आणि आदबशीर वाटला. शुद्ध मराठीत बोलत होता. प्रथम भेटीत त्याने आम्हाला आपल्या लॉजवर कॉफीपानाचे आमंत्रणही केले.

नंतर एक महिन्याने सुरेंद्रने राजीनामा दिल्याची वार्ता कळली. नोकरी न करता आपण नट बनणार असल्याची बातमी त्याने स्वतः दिली. लक्ष्मीनारायण यांच्या पिक्चरमध्ये काम करण्यासाठी आपण मद्रासला जात असल्याचे त्याने सांगितले. नंतर एकदा लक्ष्मीनारायण, सुनेत्रा आणि तो गाडीतून जाताना दिसले होते. पण मीही घाईत असल्याने हाक मारली नव्हती.

अचानक कर्णकटु आवाज कानी पडला. समोरून एक अजस्र ट्रक येत होता. विचारांच्या तंद्रीत माझे रस्त्याकडे लक्ष नव्हते ! मोठ्या मुश्किलीने गाडी वळवून मी घराच्या बाजूला वळलो.

लांबूनच हृष्टवदना मोहना दिसली. अल्पावधीत माझ्या मनाने बराच लांबचा प्रवास केला होता. घरात येताच तिला आमंत्रणाचे सांगितले आणि चटकन निघण्यास सांगितले. पार्टीला एखादेवेळेस उशीर होईल म्हणून मोहनाला म्हटलं तसा फोन कर!

घरातून बाहेर पडलो. खरेदी वगैरेमुळे जरा उशीर झाला. बंगल्याशी आलो. लांबूनच रोषणाईतली 'वेलकम' अक्षरं दिसत होती ! बंगल्यात मात्र सामसूम होती ! आश्चर्याने आम्ही आत गेलो.

हॉलमध्ये सर्वत्र मंद प्रकाश पसरला होता. मध्यभागी प्रशस्त टेबलावर पाच–पंचवीस डिशेस मांडन ठेवल्या होत्या. परंतु आमंत्रित मात्र कोणीच दिसत नव्हते.

मला पाहताच सुरेंद्रच्या वृद्ध वडिलांनी आरामखुर्चीवरून उठून म्हटले, "माधव,

अरे किती दिवसांनी दिसतोयस रे! अरे पण दारात का उभा, आत या ना!"

"मध्यंतरी सुरेंद्र मद्रासला गेल्याचे कळले."

"कसलं मद्रास अन् काय! तू त्याच्या लग्नाच्या पार्टीला आला नव्हतास ना! तेव्हाच..."

तेवढयात सुरेंद्र आत आला.

"हॅलो सुरेंद्र..." म्हणत मी पुढे झालो. पण सुरेंद्र यंत्रवत हसला! एखादे दुखणं असल्यासारखा तो दिसत होता.

"अरे, पण वहिनी कुठेत?" मी प्रश्न केला.

"ती...ती आहे ना..."

जवळजवळ अर्धा–पाऊण तास आम्ही गप्पा मारत होतो. अर्थात प्रमुख वाटा माझ्याकडेच होता. आमच्या डिशेस संपल्या. तरी वहिनी बाहेर आल्या नव्हत्या. मी पुन्हा विचारले,

"सुरेंद्र, अरे वहिनी नाही दिसत!"

"ती...ती मॅटर्निटी–होममध्ये आहे."

"ये बात है! तरीच म्हटलं स्वारी मघापासून गप्प–गप्प का! कॉंग्रॅच्युलेशन्स!" म्हणत मी त्याला गदगदा हलविले आणि हसत निरोप घेऊन बाहेर पडलो.

निम्या वाटेत आलो अन् लक्षात आलं, मोहनाची पर्स सुरेंद्रच्या बंगल्यावरच राहिली होती आणि मुख्य म्हणजे त्यात घराची किल्ली होती! तेव्हा मोहनाला पुढे व्हायला सांगून मी पुन्हा माघारी फिरलो.

सुरेंद्रच्या बंगल्यावर आलो आणि बघतो तो काय मघाचीच ती रोषणाई–दिवे सर्व बंद केलेले दिसत होते–सर्वत्र अंधार होता. दारही लावलेले होते...आता मात्र आश्चर्याची कमाल होती! मी दारावरची बेल दाबली–एकदा, दोनदा–तिनदा... तेवढयात आतून सुरेंद्रच्या हसण्याचा विचित्र आवाज आला...परत जावे की काय असेही क्षणभर वाटले. पण एवढयात दार उघडले गेले. बरोबर बाहेरचे दिवेही लागले. आत गेलो अन् बघतो तो काय कोचावर काका विमनस्कपणे गुडघ्यात डोके खुपसून बसले होते. दुसऱ्या कोचावर सुरेंद्र आडवा–तिडवा पडून वेडयासारखा हसत होता.

"सुरेंद्र...सुरेंद्र हे काय चालले आहे?" मी जवळजवळ ओरडलोच.

"त्याला काही विचारू नकोस." काकांचे वेदनापूर्ण स्वर कानी पडले.

"म्हणजे?"

"तो विचारण्याच्या पलिकडे गेला आहे...तो वेडा झाला आहे...वेडा झाला आहे."

कोणीतरी माझ्या कानात शिसाचा रस ओतत आहे असं मला वाटू लागलं... "पण काका..."

"काय सांगू बेटा तुला" असं म्हणून त्यांनी जी कहाणी सांगितली ती ऐकून मी स्तंभितच झालो.

वस्तुत: सुरेंद्रच्या लग्नाचा वाढदिवस आज नव्हता—परवा होता.

सिनेमासाठी फक्त सुनेत्राचीच निवड झाली होती. ती मद्रासला गेली होती. आणि पार्टीअगोदर आठ दिवस ती आली होती. पार्टीच्या आधी दोन-तीन दिवस स्वत: लक्ष्मीनारायणही आले होते. पार्टीच्या दिवशी वेळ संध्याकाळी ७ ते ९॥ अशी होती. दुपारीच चार वाजता सुनेत्रा जरा सिनेमाच्या कामासाठी म्हणून बाहेर पडली होती. सात वाजायला आली तरी ती परत आली नव्हती ! तेव्हा सुरेंद्र स्वत: कदाचित लक्ष्मीनारायण ज्या लॉजवर उतरले आहेत तेथे ही असेल ह्या कल्पनेने लॉजवर बघायला गेला होता !

तो जेव्हा लॉजवर आला तेव्हा तेथे सामसूम होती ! आणि लक्ष्मीनारायण यांच्या रूमला तर कुलुप होते ! तो विचारात पडला आणि आता निघणार एव-ढ्यात सुनेत्राच्या हसण्याचा आवाज त्याला आला ! खात्रीने तो आवाज सुनेत्राचाच होता ! ती मात्र कोठे दिसत नव्हती ! आवाज मात्र क्षणाक्षणाला वाढत होता ! त्याने एकदा कुलुपाकडे पाहिले आणि बंद खिडकीशी जाऊन कानोसा घेतला... आत नक्कीच सुनेत्रा होती !

काय करावे त्याला सुचेना ! तो धावतच मागच्या गॅलरीत गेला. मागील दार आतून बंद होते— खिडक्याही बंद होत्या. तावदानाच्या फटीतून त्याने आत पाहिले— आणि त्याच्या डोळयावर त्याचा विश्वासच बसेना.

सुनेत्रा आणि लक्ष्मीनारायण एकाच पलंगावर पडले होते. पलंगाच्या दांड्यावर सुनेत्राचे कपडे पंख्याच्या वाऱ्याने हलत होते ! मधेच सुनेत्राचा खुदकन् हसण्याचा आवाज येत होता— आपल्या राकट ओठांनी लक्ष्मीनारायण ते हास्य पिऊन टाकत होते......

ते पाहून सुरेंद्र रागाने बेभान झाला. क्रोधाने भडकलेल्या त्याच्या मनात अनेक विचार येत होते ! पण आता तो काहीच करू शकत नव्हता—त्याच्या अंगातले प्राणच जणू नाहीसे झाले होते. तो थिजून गेला होता— जणू गोठून गेला होता. दु:ख आणि क्रोध या भावनांनी त्याच्या मनाचा कोंडमारा झाला— सारं असह्य होऊन तो तेथून पिसाटासारखा धावत सुटला आणि थेट बंगल्यावर आला.

त्याला बघताच आमत्रितांनी त्याचे अभिनदन केले. पण तो त्यात कुठेच नव्हता. अभिनंदनाचा स्विकार तो मूकपणाने करीत होता पण त्याच्या अंत:करणात उसळ-णाऱ्या ज्वालामुखीची जाणीव अन्य कोणास असणे शक्य नव्हते! !

तेवढ्यात ' नमस्ते ' या गोड शब्दांनी सर्वांच्या नजरा दाराकडे खेचल्या गेल्या. दारात नऊवारी साडी नेसून सुनेत्रा मोठ्या आदबीने उभी होती.

अचानकपणे आमंत्रितांपैकी डॉ. रेगे सुरेंद्रजवळ येऊन मोठ्याने म्हणाले,

" मित्रहो, मि. सुरेंद्र यांचे आता मी दुसऱ्याच कारणासाठी अभिनंदन करणार आहे आणि ते कारण म्हणजे मि. सुरेंद्र आता लवकरच एका सुंदर आणि गोंडस




शाखा : सावदीरोड, अहमदनगर

डेपो : मेसर्स खरे अ‍ॅन्ड सन्स, पुणे २

मुलाचे वडील बनणार आहेत! तेव्हा त्याबद्दल दुसरी स्पेशल पार्टी पाहिजे नाही का!"

सर्वांनी सुरेंद्रचे अभिनंदन केले. तेवढ्यात लक्ष्मीनारायण हॉलमध्ये आले. मोठ्या आवाजात तेही म्हणाले, "कॉंग्रॅच्युलेशन् मि. सुरेंद्र" पण सुरेंद्र मख्खपणे उभा होता. त्याच्या या शांतपणाचे सुनेत्राला आश्चर्य वाटले. क्षणभर ती मनात चरकली!

आणि अचानक इतका वेळ शांत असलेला सुरेंद्र वेड्यासारखा हसू लागला

"हा...हा, इससे भी बढिया पार्टी होती.. आता मी बाप होणार ना... खाओ पिओऽमजा करो" असं म्हणत तिथलीच एक पेढ्याची डीश घेऊन त्याने लक्ष्मीनारायणांच्या तोंडावर दाबली! क्षणभर सर्वांना वाटले की हा मजाच करत आहे...पण ही मजा जीवघेणी मजा होती! नाकातोंडावर पेढ्याचा लगदा झाल्याने लक्ष्मीनारायणांनी तर डोळे पांढरे केले होते. ते पाहून सर्वजण चकित झाले होते. मोठ्या मुश्किलिने त्याला लक्ष्मीनारायणांपासून दूर केले तरीही तो मोठमोठ्याने हसतच होता.

'मी बाप होणार-पार्टी घ्या-असं म्हणत त्याने टेबलावरच्या डिशेस फेकण्यास सुरवात केली! रोषणाईचे दिवे-झुमरे फोडण्यास सुरुवात केली. आता तो कोणालाच आवरेना! दिसेल ती वस्तु तो फेकून देऊ लागला...

निम्मी-अधिक माणसं कधीच बाहेर पडली होती! त्याच्या जवळच एका कोपऱ्यात सुनेत्रा उभी होती-कापत कापत म्हणाली,

'तुम्हाला झालंय तरी काय?'

तिचे वाक्य पूर्ण होते ना होते तोच 'वेश्ये, तू हे मला विचारतेस' म्हणून त्याने तिला फाडकन थोबाडीत मारली! त्याच्या मारण्याने ती खाली कोसळली होती-थोड्याच वेळात हॉल रिकामा झाला होता...

काकांनी सांगितलेली कहाणी ऐकून मी सर्दच झालो होतो! दुःखावेगाने मी त्यांना म्हणालो, "मग तुम्ही हे मला आधीच का नाही सांगितले-निदान फोन केला तेव्हा तरी..."

मला अडवीत ते म्हणाले, "माधव, मी मुद्दामच सांगितलं नाही. कारण सुरेंद्रची फार फार इच्छा होती की तू पार्टीला यावस. त्याच्या लग्नाच्या पार्टीलाही नव्हतास-निदान लग्नाच्या वाढदिवसाच्या पार्टीला तरी यावस-म्हणूनच-"

मी एक दीर्घ निश्वास टाकला! सुरेंद्र अजूनही कोचावर लोळत पडून वेड्यासारखा हसत होता-त्याची ती विकल अवस्था मला पाहवेना!

अधिक काही न बोलता मोहनाची पर्स घेऊन मी उठलो-दरवाजा उघडून बाहेर पडलो-बाहेर अंधारात रोषणाई केलेली 'वेलकम्' अक्षरे क्रूरपणे हसत असल्याचा भास मला झाला-

□ □ □




**उत्तरार्ध**

**लेखांक : तीन**

द गॉलची जागरूक नजर मॉस्कोच्या दिशेने भिरभिरू लागली.

हिटलरविरुद्धच्या युद्धाचा भार यापुढे मुख्यत: रशियालाच सहन करावा लागणार

आहे आणि त्यामुळे भावी युरोपीय राजकारणाच्या दृष्टीने, व विशेषत: ब्रिटन आणि अमेरिका यांच्या वर्चस्वापासून मुक्त होण्यासाठी आपल्याला रशियाशी सलगी केली पाहिजे या जाणीवेने द गॉलचे मन आंदोलित झाले.

रशियाची मदत आपल्या उद्दिष्टाला कारक ठरेल हे खरे असले तरी रशियाला आपली जवळीक हवी आहे किंवा नाही याचा अंदाज घेण्यापूर्वी स्वत: आपण पुढाकार घेणे त्याला उचित वाटले नाही. त्यामुळे त्याने कासिन आणि देजिन या आपल्या सहकाऱ्यांवर ही जबाबदारी सोपविली. त्याप्रमाणे आठ ऑगस्टला या दोघांनी, लंडनमधील रशियन राजदूत मॅस्की याची भेट घेतली. मॅस्की याला द गॉलचे महत्त्व पटावे म्हणून कासिन मॅस्कीला म्हणाला, "आता द गॉलजवळ ऐंशी हजार सैनिक आहेत. त्यामुळे जर्मनीविरुद्ध लढण्यासाठी त्याची मदत खूपच उपयोगी ठरेल."

देजिनने सांगितले, "स्वतंत्र फ्रेंच समितीची कचेरी रशियाच्या शक्य तितक्या जवळ असली पाहिजे असंही द गॉलनं ठरविलं आहे. लवकरच तो आपली कचेरी ब्राझाव्हिलहून बैरूत इथं हलविण्याचा विचार करीत आहे."

मॅस्की उत्तरला, "ठीक आहे. हे सारं मी मॉस्कोला कळवितो."

द गॉलला केवळ मॅस्कीवर अवलंबून राहून भागण्यासारखे नव्हते. बैरूत येथे जेराद जोव्ह द गॉलचा प्रतिनिधी म्हणून काम करीत होता. कासिन आणि देजिन यांनी लंडनमध्ये मॅस्की याची भेट घेतल्यानंतर दोन दिवसांनी जोव्हने अंकारा येथील रशियन राजदूत एस. व्हिनोग्राडोव्ह याची भेट घेतली. जोव्ह म्हणाला, "रशियासंबंधी द गॉल नेहमीच आदरानं बोलत असतो. रशिया जर्मनीविरुद्ध लढत आहे याचा आपल्याला विशेष आनंद वाटतो असं त्यानं नुकतच मला कळविलं आहे. हे महायुद्ध केव्हा संपेल हे कोणीच सांगू शकत नाही. परंतु या महायुद्धामध्ये जर्मनीचा पराभव होणार याबद्दल द गॉलला किंचितही शंका नाही. हिटलरच्या बेफाम महत्त्वाकांक्षेला रोखण्याचं कार्य रशियाइतकं कुणालाच जमणार नाही."

आपण सलगी निर्माण करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी रशियन नेते तडकाफडकी द गॉलच्या स्वतंत्र फ्रेंच समितीला मान्यता देणार नाहीत हे जोव्हला ठाऊक होते म्हणून तो म्हणाला, "रशियानं ताबडतोब एक गोष्ट करावी असं आम्हाला वाटतं. आम्ही आमच्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'च्या दोन-तीन सदस्यांचं शिष्टमंडळ मॉस्कोला धाडलं तर तुम्ही त्या शिष्टमंडळाला कचेरीसाठी जागा द्यावी. म्हणजे आज जी ब्रिटनमार्फत आम्हाला तुमच्याशी बोलणी करावी लागतात त्याऐवजी आपापसात विचारविनिमय करता येईल."

ब्रिटनपेक्षा फ्रान्स हाच रशियाच्या दृष्टीने कसा जवळचा देश आहे हे व्हिनोग्राडोव्हच्या मनावर ठसविण्यासाठी जोव्ह म्हणाला, "खाडीच्या पलिकडे असलेल्या

ब्रिटनला युरोपसंबंधी फ्रान्स किंवा रशिया यांच्याइतकं ममत्व वाटत नाही. फ्रान्स आणि रशिया यांचे प्रश्न बरेच समान आहेत. ब्रिटनपेक्षा आपली उद्दिष्टंही वेगळी आहेत. जर्मनीचा पराभव झाल्यानतर युरोपमध्ये कोणत्या समस्या निर्माण होतील याची फ्रान्स आणि रशिया यांना जेवढी जाण आहे तेवढी ब्रिटनला नाही. एक तर ब्रिटिश सरकारला आपले प्रश्न समजणार नाही आणि समजा समजले तरी ते त्या प्रश्नांबाबत युरोपशी समरसही होणार नाही."

दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला तेव्हा नाझी जर्मनीचा हुकूमशहा हिटलर आणि साम्यवादी रशियाचा सर्वसत्ताधारी स्टॅलिन यांच्यात अनाक्रमणाचा करार झाला होता, युरोपमधील या दोन परंपरागत शत्रूंची ही विचित्र शय्यासोबत फार काळ टिकणार नाही हें सर्वांनाच माहित होते, पण हे केव्हा घडेल याचे जातक वर्तविणे प्रारंभीच्या काळात अशक्य होते. सारा पश्चिम युरोप आपल्या शस्त्र-सामर्थ्याच्या बळावर गदगदा हलवून सोडल्यावर हिटलरने रशियन भूमीवर पदार्पण करण्याचे ठरविले. २२ जून, १९४१ रोजी जर्मनी आणि रशिया यांच्यात युद्ध सुरू होताच, महायुद्धाला सर्वस्वी वेगळे वळण लागलेले आहे याचा द गॉल याला अचूक अंदाज आला होता. हे मॅस्की आणि व्हिनोग्राडोव्ह यांच्यामार्फत त्याने जी बोलणी सुरू केली त्यावरून प्रतीत होते.

ब्रिटनच्या मेहेरबानीवर अवलंबून राहण्याची आपली अवस्था लवकर संपली पाहिजे ही तर लंडनला आल्यापासून द गॉलची तीव्र इच्छा होती. परंतु ही मेहेर-बानी झिडकारून टाकण्याजोगी परिस्थिती निर्माण होईपर्यंत त्याला चरफडत बसण्यावाचून गत्यंतर नव्हते. जर्मनीविरुद्धच्या युद्धामध्ये आता रशिया सहभागी झालेला असल्यामुळे केवळ ब्रिटनवर अवलंबून राहण्याची वेळ संपुष्टात आलेली आहे हा विचार द गॉलच्या मनात उसळया मारू लागला.

द गॉलच्या आवाहनाला रशिया कसा प्रतिसाद देतो यावर बरेच अवलंबून होते, रशियासारख्या बलाढ्य सत्तेला, आपल्यासारख्या एका पराभूत देशाच्या निर्वासित नेत्याची उपेक्षा करणे शक्य असले तरी सोयीचे नाही असे द गॉलचे मन त्याला ग्वाही देत होते. रशियाला आपल्यासंबंधी अगत्य वाटावे असे वातावरण निर्माण करायला हवे हे ओळखून त्याने ठरीव तंत्र अवलंबले. ब्रिटन आणि अमेरिका यांच्यासंबंधी आपल्या मनात किंचितही आदर नाही अशा पद्धतीने द गॉल बोलू लागला. विशेषत: 'जर्मनीधार्जिण्या व्हिशी सरकारबाबत कणखर धोरण स्वीकारायला नकार देण्यामागे अँग्लो-अमेरिकनांची प्रतिगामी भूमिका कारणीभूत आहे' हा रशियाला समजणारा आणि आवडणारा आरोप द गॉलच्या वक्तव्यातून फस-फसायला प्रारंभ झाला.

जर्मनी आणि रशिया यांच्यातील रणसंघर्षाला सुरुवात झाल्यानंतर, प्रारंभी जर्मनी चढाईला वायुवेग प्राप्त झाला होता. रशियन सेनेला जागोजाग माघार

घ्यावी लागत होती. हा हा म्हणता हिटलर मॉस्कोच्या वेशीपाशी जाऊन थडकला. त्याने जंग जंग पछाडले, पण त्याला मॉस्कोचे दार काही उघडता आले नाही. महायुद्धाबद्दलचे हिटलरचे हिशोब येथपासून चुकत गेले.

जर्मन चढाईला पायबंद बसला तेव्हा द गॉल आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, " रशियाचा विजय निश्चित झाला आहे असं आता पक्कं समजा."

पंचवीस नोव्हेंबरला द गॉलने स्वत: बोगोमोलोव्ह या रशियन राजदूतांची भेट घेतली. द गॉल बोगोमोलोव्ह याला सांगू लागला, 'रशिया आणि जर्मनी यांच्यातील युद्धाच्या निकालावरून युद्धोत्तर जगाचं स्वरूप ठरणार आहे. म्हणून मला असं वाटतं की हिटलरी सैन्याशी झुंजणाऱ्या रशियन सेनेबरोबर आमच्याही काही पथकांना या लढाईत भाग घ्यायची संधी मिळावी. हे कसं काय शक्य होईल याचा विचारविनिमय करण्यासाठी 'स्वतंत्र फ्रेंच समिती'च्या शिष्टमंडळाला मॉस्कोला जायची, तिथं रहायची परवानगी मिळायला हवी."

द गॉलचे हे म्हणणे बोगोमोलोव्ह याने आपल्या वरिष्ठांना कळविले. 'स्वतंत्र फ्रेंच समिती'च्या शिष्टमंडळाला मॉस्कोत यायला आपले सरकार परवानगी देत आहे, हा निरोप कळविण्यासाठी बोगोमोलोव्ह याने नऊ डिसेंबरला द गॉलला बोलावून घेतले. यावेळी त्याशिष्टमंडळामध्ये कोणाचा समावेश होईल यासबंधीचा तपशील द गॉलने कथन केला. दोन मुलकी आणि एक लष्करी असे तिघे अधिकारी मॉस्कोला पाठविण्याचा आणि या शिष्टमडळाचे नेतृत्व रॉजर गारो याच्याकडे सोपविण्याचा आपला मनोदय द गॉलने बोगोमोलोव्ह याच्या कानांवर घातला. सिरियातील फ्रेंच सेनेपैकी एकदोन डिव्हिजन सैन्य रशियन आघाडीवर पाठविण्याच्या आपल्या इच्छेचा द गॉलने पुनरुच्चार केला. द गॉल म्हणाला, "आमची ही विनंती रशियन सेनानींनी मान्य केली तर मी आमच सैन्य ताब्रिझ इथं धाडण्याची व्यवस्था करतो."

द गॉल आणि बोगोमोलोव्ह यांच्या चर्चेमध्ये ब्रिटिश सेनेच्या लिबयातील माघारीचा विषय निघाला. द गॉल म्हणाला, " रणगाडे कसे वापरावेत हे ब्रिटिश सेनानींना बिलकुल माहित नाही. जर्मन रणगाड्यांनी तडाखे दिल्यानंतर आता ते कुठं शिकू लागले आहेत. जर्मनीचा पराभव करण्याचं सामर्थ्य एकट्या रशियाजवळ आहे. ब्रिटनला ते कधीच जमणार नाही. म्हणून तर फ्रेंच पथकांना रशियन आघाडीवर धाडायला माझा जीव आसुसतो आहे."

"पण तसं करायला ब्रिटिश सेनानी मुभा देतील का?" बोगोमोलोव्हने विचारले.

द गॉल उत्तरला, "तुमची शंका बरोबर आहे. सिरियातलं आमचं सैन्य ब्रिटिशांच्या हाताखाली आहे हे खरं आहे. परतु या सैन्याचा काही भाग रशियामध्ये पाठवायला ते खळखळ करणार नाहीत."

द गॉलचा हा अंदाज चुकला.

ट्युनिसच्या दिशेने निघालेल्या ब्रिटिश लष्कराची घोडदौड ओसरली होती आणि त्यामुळे उत्तर आफ्रिका मोकळी होईपर्यंत या लष्कराला आपल्या सामर्थ्यात कपात होणं मंजूर नव्हते. ३ फेब्रुवारी १९४२ रोजी ब्रिटिश सेनानी जनरल ऑचिनलेक याने द गॉलला कळविले– "फ्रेंच सैन्य अन्यत्र हलवायला आमचा सक्त विरोध आहे."

ब्रिटिश सेनानी गरजेपोटी फ्रेंच सैन्याला आपले सैन्य असे म्हणत असले तरी या सैन्याकडे कोणतीही महत्त्वाची कामगिरी सोपविण्याबाबत ते टाळाटाळ करीत होते. फ्रेंच सेनानींना या अपमानास्पद वर्तनामुळे संताप वाटे. आपल्याला हा जो दुय्यम दर्जा देण्यात येत आहे तो थांबला पाहिजे असे ते द गॉलला कळवीत. ब्रिटिश लष्कराच्या या वर्तनासंबंधी आपली तीव्र नापसंती द गॉल रशियन राजदूताच्या कानावर घालत होता.

१९४२ च्या मेमध्ये रशियन परराष्ट्रमंत्री ब्रिटिश सरकारशी चर्चा करण्यासाठी लंडनला आला होता. त्या वास्तव्यात मोलोटोव्हने द गॉलची मुद्दाम भेट घेतली. यावेळी मादागास्कर या फ्रेंच साम्राज्यांतर्गत बेटावर ब्रिटिश लष्कर उतरत होते. मादागास्कर हा फ्रेंच प्रदेश असूनही या चढाईमध्ये द गॉलच्या सैन्याला सहभागी करून घ्यायला ब्रिटिश सेनानींनी साफ नकार दिला. इतकेच नव्हे तर आपली ही चढाई यशस्वी व्हावी म्हणून त्यांनी व्हिशी सरकारच्या तेथल्या अधिकाऱ्यांकडे सहकार्याची मागणी केली.

मोलोटोव्हशी बोलताना द गॉलने ब्रिटनच्या या आपमतलबी वर्तनासंबंधी कठोर उद्‌गार काढले. तो म्हणाला, "स्वतःला गरज आहे म्हणून आमचं सैन्य वापरायचं, परंतु 'स्वतंत्र फ्रेंच समिती 'ला काहीही राजकीय महत्त्व द्यायचं नाही असं ब्रिटन–अमेरिकेचं धोरण आहे. मला चीड येते ती याची. मादागास्करसारख्या फ्रेंच प्रदेशाबाबत अँग्लो–अमेरिकन आमच्याशी उर्मटपणानं वागत आहेत. मग इतर ठिकाणी ते आम्हाला काय किंमत देत असतील हे जाणून घेणं अवघड नाही."

मोलोटोव्हने द गॉलची समजूत काढण्यासाठी म्हटले, "मी याबाबत अँग्लो–अमेरिकनांशी बोलणं करीन. 'स्वतंत्र फ्रेंच समिती 'च्या तक्रारीची रशियानं दखल घ्यावी ही गोष्ट त्यांना कितपत आवडेल कुणास ठाऊक"

द गॉलही चतुर होता. मोलोटोव्हसारखा मुरब्बी मुत्सद्दी सहजासहजी आपल्या विनंतीला मान देणार नाही हे त्याला माहित होते. त्यामुळे द गॉलने मुद्दाम दुसऱ्या आघाडीचा विषय काढला. तो मोलोटोव्हला सांगू लागला, "पूर्व आघाडीवर रशिया एकाकी अवस्थेमध्ये जर्मन सेनेशी लढत असताना, रशियन सेनेवरचे दडपण दूर करण्यासाठी ब्रिटनने पश्चिम युरोपमध्ये दुसरी आघाडी लवकर उघडायला हवी असं मला खूप वाटतं. ब्रिटननं परवानगी दिली तर मी आमचं सैन्य उत्तर फ्रान्स–

मध्ये उतरवावयाला तयार आहे. एकदा मी तसं सुचवूनही पाहिलं. पण शस्त्रास्त्रांची मदत करायला ब्रिटिश सेनानींनी साफ नकार दिला. रशिया ज्या निर्धारानं लढत आहे ते पाहून फ्रान्समधला सर्वसामान्य नागरिक खूष झाला असून रशियन सेनेला आपण मदत केली पाहिजे असं फ्रान्समध्ये सगळीकडे ऐकू येते."

तरीही मोलोटोव्हने मोघम उत्तर दिले-" मला काय करता येईल ते पाहतो."

ब्रिटिश आणि अमेरिकन नेते आपल्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती 'ला महत्त्व देत नाहीत याची द गॉलला जाणीव व्हावी असे प्रसंग वारंवार घडत होते. या कालखंडात उत्तर आफ्रिकेतून जर्मनीला हाकलून देण्यासाठी ब्रिटिश आणि अमेरिकन सेनानींची पराकाष्ठा चालली होती. त्यासाठी त्यानी एक योजना आखली. ब्रिटिश सेनेने नायजेरवर हल्ला करायचा आणि त्याचवेळी अमेरिकन नौदलाने डाकार बंदराचा ताबा घ्यायचा असा हा बेत होता. अशा या महत्वपूर्ण योजनेबाबतही द गॉलच्या ' स्वतंत्र फ्रेंच समिती ला अंधारात ठेवण्यात आले. या योजनेचा द गॉलला सुगावा लागला तेव्हा, ही योजना आपल्याला न कळविता अँग्लो-अमेरिकनांनी कार्यवाहीत आणली तर ब्रिटनबरोबरचे संबंध आपण तोडून टाकायचे असे रागाच्या भरात त्याने ठरविले. इतकेच नव्हे तर त्याने बोगोमोलोव्ह याला विचारले, " जर मी ब्रिटनचा हात झिडकारला तर मला आणि माझ्या सैनिकांना रशियन भूमीवर आसरा मिळेल ना ?"

आठ-दहा दिवस गेल्यानंतर द गॉल भानावर आला. रागाच्या भरात आपण कितीही संतापलो, चिडलो तरी ब्रिटनबरोबरचे संबंध तोडून टाकणे आपल्याला सोयीचे ठरणार नाही हे त्याचे त्यालाच पटले. बोगोमोलोव्हशी आपण हे बोलायला नको होते हेही त्याला जाणवले. म्हणून त्याने देजिन याला बोगोमोलोव्हकडे धाडले. देजिन बोगोमोलोव्ह याला सांगू लागला, " ब्रिटिशांबरोबरचे आपले संबंध पूर्णपणे बिघडल्याचं द गॉलनं तुला सांगितलं ते तितकसं खरं नाही. त्याचप्रमाणे आमचं सर्व सैन्य रशियामध्ये हलविणं व्यवहार्यही ठरणार नाही. त्यामुळे तू द गॉलच्या परवाच्या बोलण्याबद्दल तूर्त मॉस्कोला काहीच कळवू नकोस."

द गॉलने देजिनमार्फत बोगोमोलोव्हकडे हा निरोप धाडला असला तरी द गॉलच्या संतापाची ब्रिटिश सरकारला दखल घ्यावी लागली. आपल्याबरोबर संबंध तोडण्याची भाषा द गॉल रशियन प्रतिनिधीशी करीत आहे हे कळताच अँग्लो-अमेरिकन सेनानींनी त्याला कळविले-" तुला विश्वासात घेतल्याशिवाय डाकारवर हल्ला करण्यात येणार नाही याबद्दल निश्चिन्त रहा."

द गॉल स्वतःच्या मनाशी पुटपुटला, " एवढं आश्वासनही कमी नाही."

द गॉल सव्वीस नोव्हेंबरला बोगोमोलोव्ह याला पुन्हा भेटला. यावेळी स्टॅलिनग्राडच्या लढाईला तोंड लागले होते. या जीवघेण्या लढाईतून आपण सुखरूप बाहेर कसे पडायचे ही साऱ्या रशियाची चिंता होती. सगळ्या जगाचे लक्ष या निर्णायक

लढाईकडे लागलेले होते. द गॉल बोगोमोलेव्हला म्हणाला, "रशिया स्टॅलिनग्राड-मधला रस्ता न् रस्ता झुंजवीत असताना जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारण्याची आपण आपल्या देशबांधवांना हाक द्यावी असं मला वाटत आहे. त्यासाठी फ्रेंच कम्यु-निस्टाचं सहकार्य घ्यायचीही माझी तयारी आहे. ब्रिटिशांना काय वाटतं याची मला पर्वा नाही."

"ब्रिटिशांबद्दल तू एवढा का अविश्वास दाखवितोस ?"

"स्वतंत्र फ्रेंच सेनेचं नेतृत्व माझ्याकडे आहे ही गोष्ट त्याना मंजूर नाही. मला बडतर्फ करून, माझ्या जागी त्यांचं ऐकणारा फ्रेंच सेनानी त्यांना नेमायचा आहे म्हणून," द गॉलने उत्तर दिले.

द गॉलचा ब्रिटनवरचा संताप त्याच्या दृष्टीने वाजवी असला तरी ब्रिटन या काळात अतिशय खडतर परिस्थितीतून जात होते. आग्नेय आशियातील सिंगापूर-सारखे मोक्याचे बंदर जपान्यांच्या हाती पडले होते, आफ्रिकेमध्ये टोब्रुक गमवावे लागले होते, युरोपीय आघाडीवरही निष्क्रीय शांतता दाटून आलेली होती. सिरि-यातील जुने फ्रेंच प्रशासन रद्द करून त्या जागी आपली प्रशासन-यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न फसला होता. त्यामुळे ब्रिटिश सेनानी युरोपमध्ये दुसरी आघाडी उघडण्याची भाषा बोलत असले तरी त्यात दम नव्हता आणि त्यामुळेच ते द गॉलच्या त्रागाकडे दुर्लक्ष करीत होते. त्यांनी जर द गॉलशी दुसऱ्या आघाडीचा विषय काढला असता तर त्याने तात्काळ उचल खाल्ली असती. त्यामुळे द गॉलशी बोलणही नको आणि भांडणेही नको अशी ब्रिटिश सेनानींची भूमिका होती.

स्वतंत्र फ्रेंच समिती स्थापन होऊन आता दोन वर्षे झाली होती. द गॉलने पुढा-कार घेतला म्हणूनच ही समिती स्थापन झाली आणि या समितीमुळेच जर्मनी-विरुद्धच्या युद्धात फ्रान्सचा लहानसा का होईना सहभाग लाभला ही वस्तुस्थिती चर्चिलनेही मान्य केली आहे. स्वतंत्र फ्रेंच समितीच्या अस्तित्वाला राजकीय महत्त्वही होते. परंतु त्याचबरोबर या काळात 'समिती'चा प्रभाव वाढू शकला नाही हेही तितकेच खरे होते. तसे घडायला दोन कारणे होती. एक असे की स्वतंत्र फ्रेंच समितीच्या सैन्याने स्वतंत्रपणे एखादी लढाई जिंकली आहे असे घडले नाही. दुसरे कारण हे की द गॉलला त्याला शोभेसे सहकारी लाभले नाहीत. त्यामुळे 'स्वतंत्र फ्रेंच समिती' म्हणजे द गॉलचा एकपात्री कार्यक्रम असेच या खटाटोपाचे त्यावेळचे स्वरूप होते. अशा या विपरित परिस्थितीत द गॉलची धडपड स्पृहणीय होती. मध्य आफ्रिकेतील फ्रेंच साम्राज्य आपल्या पाठीशी उभे करण्यात तो यशस्वी झाला होता. शिवाय सेंट पिएर आणि मिकेलेन ही कॅनडालगतची बेटे त्यांनी अमेरिकेच्या विरोधाला न जुमानता हस्तगत केली होती.

हा पराक्रम वाया जाणारा नव्हता.

दोन वर्षांच्या परिश्रमानंतर द गॉलच्या प्रयत्नांना यशाचे क्षितिज दिसू लागले.

त्यांची 'स्वतंत्र फ्रेंच समिति' आता 'फ्रेंच राजकीय-समिती' म्हणून संबोधिण्यात येऊ लागली आणि फ्रान्सचे प्रातिनिधिक सरकार म्हणून ब्रिटन, रशिया आदी अनेक राष्ट्रांनी या राष्ट्रीय समितीला मान्यता दिली. अमेरिकेने तेवढा या समितीला आशीर्वाद दिला नाही; परंतु त्यामागे द गॉलसंबधीचा वैयक्तिक दुस्वासच मुख्यतः कारणीभूत होता.

मध्य आफ्रिकेमध्ये द गॉलला जेवढे यश लाभले तेवढेच अपयश त्याला उत्तर आणि पश्चिम आफ्रिकेमध्ये त्याला पचवावे लागले. उत्तर आफ्रिकेप्रमाणं खुद्द फ्रान्स हाही द गॉलच्या योजनेतील कच्चा दुवा होता. आपल्या आंदोलनाला फ्रान्समध्ये गती लाभावी यासाठी द गॉलने नाना प्रयत्न केले; पण तेथे तो मूळ धरू शकत नव्हता. फ्रान्समध्ये प्रतिकाराची भावना निर्माण झाली नव्हती असे नाही. ठिकठिकाणी अनेक प्रतिकार-समित्या स्थापन झाल्या होत्या. त्याचे फटकळ उद्रेक होत होते. परंतु या समित्यांच्या कार्यात सूत्रबद्धता नव्हती. त्याचप्रमाणे या देशांतर्गत समित्यांना द गॉलचा वरचष्मा मान्य नव्हता. म्हणून द गॉलने असे सुचविले की जर्मन आक्रमण हटवावे असे ज्यांना ज्यांना वाटते त्यांनी हे सारे कार्य एका विशिष्ट पद्धतीने चालावे यासाठी आपल्याला नाममात्र प्रमुख मानावे. फ्रान्समधील प्रतिकार-समित्यांच्या सूत्रधारांची समजूत काढण्यासाठी द गॉलने जीन मोलिन यास पॅरिसला धाडले.

फ्रान्समधल्या प्रतिकार समित्या मुख्यतः कम्युनिस्टांच्या पुढाकाराने स्थापन झाल्या होत्या. जर्मन सैनिकांचे खून करणे, त्यांच्या छावण्यावर हातबॉंब फेकणे असे छुप्या युद्धांचे तंत्र कम्युनिस्ट कार्यकर्ते अवलंबित होते. द गॉलला हा मार्ग आत्मघातकी वाटत होता. या अशा फटकळ आणि तुरळक प्रयत्नांमुळे परिणाम एवढाच होईल की फ्रान्समधील जर्मन लष्करी प्रशासन अधिक कठोर निर्घृण होईल असे त्याचे मत होते. कम्युनिस्टांवर संपूर्ण नियंत्रण घालणे द गॉलला सर्वस्वी अशक्य होते, त्यांनी आपले नेतृत्व मानले तर हे असले एकांडे प्रयत्न कमी होऊन प्रतिकार-मोहिमेला संघटित स्वरूप लाभेल अशी त्याची मनोधारणा होती.

फ्रान्सच्या मुक्ततेसाठी धडपडत असलेल्या सर्व गटांना एकत्र आणण्यासाठी द गॉलने आपल्या स्वतंत्र फ्रेंच सेनेचे 'लढाऊ फ्रान्स' असे नामांतर केले. यात फ्रेंच कम्युनिस्टांना स्थान मिळणार असल्यामुळे इतर कोणत्याही देशापेक्षा प्रथम रशियाने या 'लढाऊ फ्रान्स'चे सहर्ष स्वागत केले. मात्र त्याबरोबरच द गॉलची फ्रेंच राष्ट्रीय समिती हीच 'लढाऊ-फान्स'चे धोरण आणि कार्यक्रम निश्चित करील असेही मॉस्कोहून जाहीर करण्यात आले. याचा अर्थ असा की फ्रान्सच्या मुक्ति-मोहिमेचा नेता म्हणून आपण द गॉल यालाच ओळखत आहोत हे रशियाने निःसंदिग्ध रीतीने मान्य केले.

द गॉलच्या दृष्टीने हा मोठाच विजय होता.

रशियाने द गॉलच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केल्यामुळे फ्रान्समधील अनेक कार्यकर्ते लंडनला येऊन द गॉलच्या प्रभावळीमध्ये दाखल झाले. यात डाव्या पक्षांच्या कार्यकर्त्यांचाही समावेश होता हे द गॉलच्या दृष्टीने विशेष होते. १९४३ च्या जानेवारीमध्ये पॅरिसहून आलेल्या फर्नान्द ग्रेनिए याने द गॉलला एक महत्त्वाची बातमी सांगितली– ' फ्रेंच कम्युनिस्ट पक्ष ' लढाऊ फ्रान्स ' संघटनेचा घटक म्हणून कार्य करायला तयार आहे. ' द गॉलला कम्युनिस्ट पक्षाविषयी मुळीच आस्था नव्हती. उलट कम्युनिस्टांबद्दल त्याच्या मनात रागच होता. परंतु ही वेळ अशी होती की, फ्रान्समधील प्रतिकार-लढा चालू रहाणे, त्याची व्याप्ती वाढणे ही एकच गोष्ट द गॉलला समजत होती आणि त्यामुळे कम्युनिस्टांच्या सहकार्याचा स्वीकार करताना त्याला संकोचही वाटला नाही, खेदही झाला नाही.

द गॉलने मोलिन याला १९४३ च्या मेमध्ये पुन्हा पॅरिसला धाडून राष्ट्रीय प्रतिकार मंडळाची स्थापना केली. उत्तर फ्रान्समधील जर्मन प्रशासन आणि दक्षिण फ्रान्समधील जर्मनीधार्जिणे व्हिशी सरकार यांच्याविरुद्ध उठाव करण्याचे कार्य या मंडळामार्फत पार पाडले जाणार होते. त्यामुळे अनेक कामगार संघटना आणि राजकीय पक्ष या मंडळामध्ये दाखल झाले. स्वातंत्र्यप्रेमी फ्रान्स द गॉलच्या पाठीशी उभा आहे हे सिद्ध करण्याच्या दृष्टीने या राष्ट्रीय प्रतिकार मंडळाचा मोठाच उपयोग होणार होता. द गॉलच्या नेतृत्वाखाली फ्रान्सचे हंगामी सरकार स्थापन करण्यात यावे असा ठराव राष्ट्रीय प्रतिकार मंडळाने केल्यामुळे द गॉलच्या प्रतिष्ठेत महत्त्वपूर्ण भर पडली.

एकीकडे द गॉलचे नेतृत्व स्थिरपद होत होते आणि दुसरीकडे ब्रिटिश आणि अमेरिकन सेनाप्रमुख त्याची उपेक्षा करीत होते. उत्तर आफ्रिकेमध्ये उतरण्याचा द गॉलचा १९४२ च्या नोव्हेंबरमधील प्रयत्न फसल्यानंतर तर अँग्लो-अमेरिकन सेनानींनी द गॉलच्या अस्तित्वाची दखलच घ्यायची नाही असा जणू निर्णय केला. फ्रान्समध्ये जसे द गॉलचे नेतृत्व सर्वमान्य झाले तसे उत्तर आफ्रिकेमध्ये होऊ नये म्हणून अॅडमिरल लेव्ही, रॉबर्ट मर्फी प्रभृती अमेरिकन अधिकाऱ्यांनी उत्तर आफ्रिकेतील द गॉलविरोधी फ्रेंच कार्यकर्त्यांना हाताशी धरून त्यांच्याकरवी ' उत्तर आफ्रिका प्रतिकार समिती ' अशी वेगळी संघटना स्थापन केली.

अमेरिकेप्रमाणेच ब्रिटनचे धोरणही द गॉलला शक्यतो सहाय्य करायचे नाही असेच होते. यासंबंधात खुलासा करून घेण्यासाठी द गॉलने एकोणतीस सप्टेंबर रोजी चर्चिल आणि ईडन यांची भेट घेतली. सिरिया आणि लेबॅनॉन येथील परिस्थितीसंबधी चर्चा होत असताना चर्चिल म्हणाला, " या दोन्ही देशात निवडणूक घेऊन तेथील लोकमत अजमावलं पाहिजे आणि त्या आधारे तेथे कोणाची राजवट स्थापन करायची याचा निर्णय केला पाहिजे. "

द गॉलने या सूचनेला विरोध केला. तो म्हणाला, " सिरिया-लेबॅनॉनसारख्या

फ्रेंच प्रदेशात निवडणूक घ्यायची की नाही हे आम्ही ठरवायचं आहे. इतरांनी हस्तक्षेप करता कामा नये."

हे उत्तर ऐकताच चर्चिल भडकला. तो म्हणाला, "म्हणूनच मादागास्कर ताब्यात घेताना इतरांना विचारायचं कारण नाही असं आमचंही धोरण आहे."

दोघेही संतापले. शब्दांच्या ठिणग्या उडू लागल्या. चर्चिलचा संताप अनावर झाला. तो द गॉलला म्हणाला, "मी म्हणजे फ्रान्स आहे अशी तू नेहमी बढाई मारतोस. पण मी तुला ओळखत नाही. तू आणि तुझं लष्कर फ्रेंच जनतेचं नेतृत्व करता हे मला मान्य आहे. परंतु तुझ्याशिवाय इतर अनेक फ्रेंच लोक असे आहेत की तेही फ्रान्सच्या स्वातंत्र्यासाठी झगडत आहेत. तू एकटा म्हणजे काही फ्रान्सचं सर्वस्व नव्हेस!"

द गॉल रागाने बाहेर पडला.

मागाहून चर्चिललाही हे पटले की द गॉलला असे बोलायला नको होते. म्हणून या चकमकीनंतर थोड्याच दिवसांनी ईडन याने घोषणा केली–'मादागास्कर येथील हायकमिशनर म्हणून आम्ही द गॉलचा सहकारी लेंगेथिहोम याची नेमणूक करण्याचं ठरविलं आहे.'

उत्तर आफ्रिकेमध्ये आपल्याला मनःपूत वागायला मिळावे म्हणून अँग्लो-अमेरिकनांनी हे मधाचे बोट आपल्या तोंडाला लावले आहे हे द गॉलला पुरेपूर माहित होते.

द गॉल हा कमालीचा महत्त्वाकांक्षी असून त्याची वागणूक हुकूमशहासारखी आहे असे रूझवेल्टचे पहिल्यापासून मत होते. त्यातून द गॉलने कम्युनिस्टांशी सहकार्य करण्याचे ठरविल्यापासून तर तो अमेरिकन परराष्ट्रखात्याच्या नजरेला सलू लागला. त्यामुळे आपले ऐकेल असा फ्रेंच सेनानी शोधण्याचे अमेरिकेने ठरविले. द गॉलला प्रतिस्पर्धी निर्माण करण्याच्या अट्टाहासातून अमेरिकेने जनरल हेन्री जिराद याला हाताशी धरले. द गॉलने आपल्या मनाला बजावले, "आता तुला जिरादशी मुकाबला करावा लागणार आहे."

कोणाचाही हस्तक व्हायला नाकारणाऱ्या द गॉलला हे नवे आव्हान स्वीकारणे भाग होते. त्यामुळे त्याच्या नेतृत्वाचा कसहि लागणार होता.

( क्रमशः )

गेल्याच आठवड्यात रोल्स-रॉईस
या जगप्रसिद्ध ब्रिटिश मोटार कंपनीचा
आर्थिक डोलारा साफ कोसळला
आणि आज कंपनी
दिवाळखोरीच्या कड्यावर उभी आहे.

# रोल्स-रॉईस

सुभाष भिडे

हेन्री रॉईस व चार्लस् रोल्स यांचे आत्मे आज स्वर्गात तळमळत असतील. आपल्या घामाचे व रक्ताचे खतपाणी घालून त्यांनी मोठी केलेली त्यांची प्राण-प्रिय कंपनी – रोल्स रॉईस आज दिवाळखोरीच्या कड्यावर उभी आहे. रोल्स रॉईसचे तारू भर समुद्रातच बुडू लागले आहे आणि किनारा तर अजून दिसतही नाही. आकाशच फाटल्यावर कुठे म्हणून ठिगळ लावणार ? एखादे वेळी इंग्लंडच्या एखाद्या वृत्तपत्रात पुढीलप्रमाणे एखादा गृह्यसंस्कार येईल–' कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की इंग्लंडची सर्वश्रेष्ठ व प्रिय कंपनी रोल्स रॉईस आज ख्रिस्तवासी झाली. हजारो लोकांना तिने अन्नाला लावले. शेकडो लोक तिच्या जिवावर आपल्या वैभवाचे प्रदर्शन करीत फिरत होते. मृत्यूसमयी तिचे वय अवघे ६४ वर्षांचे होते. इश्वर मृतात्म्यास सद्गती देवो. !

आमचे राजे-महाराजे मोठ्या दिमाखने या रोल्स रॉईस गाड्यातून हिंडत असत. जवळ अक्कल असण्यापेक्षा रोल्स रॉईस असणे ही अभिमानाची गोष्ट मानली जात होती. राजे-महाराजांची शेवटची निशाणी असलेले त्यांचे तनखे रद्द करण्याच्या आम्ही खटपटीत आहोत व तिकडे त्यांची रोल्स रॉईस कंपनी दिवाळ्यात निघते. किती विचित्र योगायोग हा ! राजाश्रयाशिवाय जगता येणे अवघड असते म्हणतात ते खरे तर नाही ?

मागच्या आठवड्यात रोल्स रॉईस या जगप्रसिद्ध कंपनीचा अर्थिक डोलारा

पत्र्यांच्या बंगल्यासारखा कोसळला. ब्रिटीश तांत्रिकी ज्ञानाचे व शोधक प्रतिमेचे सर्वोच्च प्रतिक म्हणून गेली ५० वर्षे रोल्स रॉईसकडे अभिमानाने पाहिले जात होते. दर्जापेक्षा अधिक उत्पादनावर लक्ष केंद्रीत करण्याच्या आजच्या युगात कंपनीने आपल्या उत्पादनांचा दर्जा टिकवला होता ही अभिमानाची गोष्ट आहे. दर्जा या शब्दापासून रोल्स रॉईस या शब्दाची फारकत करणे केवळ अशक्य आहे.

आज एखाद्या संस्थानासारखा पसारा वाढलेल्या या कंपनीची सुरुवात किती छोट्या अवस्थेत झाली ! श्री. हेन्री रॉईस यांच्या डोक्यात प्रथम मोटारीची कल्पना चमकली. अत्यंत गरिबीतून वर आलेल्या हेन्रीने तारखात्यात जीवनास सुरुवात केली. पुढे एका मित्राच्या भागिदारीत त्याने इलेक्ट्रीकल इंजिनिअरचा व्यवसाय सुरू केला. तेव्हा त्याचे भांडवल होते रु. ३८० व त्याच्या मित्राचे होते रु. ९००।–. परिस्थिती जरा सुधारल्यावर हेन्रीने एक सेकंड हँड फ्रेंच मोटार विकत घेतली. पण ही गाडी म्हणजे चलती का नाम गाडी टाईप खटारा होता. जास्त वेळ ती गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी पडलेली असे. सतत दुरुस्ती करून करून हेन्री वैतागला व आपली आपणच एक मोटार तयार करण्याचे त्याने ठरविले. त्याची त्याने एक दोन सिलेंडरचे मोटार इंजिन तयार केले. त्याच गावच्या एका घोडागाडीच्या कारखानदाराने हेन्रीच्या मोटारची बॉडी करून दिली. पुढे त्याची श्री. चार्लस रोल्स या उमरावाशी ओळख झाली. मोटारी विकणे हा त्याचा व्यवसाय होता. धंद्यासाठी एकत्र येणे दोघांच्या फायद्याचे आहे हे पाहून त्यांनी १९०६ मध्ये ' रोल्स-रॉईस ' कंपनीची स्थापना केली. थोड्याच काळात सर्वोत्तम दर्जाच्या मोटारींबद्दल ' रोल्स-रॉईस ' हे नाव सर्वांच्या तोंडी मशहूर झाले.

मोटारी तयार करणे, विमान उत्पादक कंपन्यांसाठी विमानाची इंजिने तयार करणे, इंग्लंडचे महत्त्वाचे कित्येक डिफेन्स प्रोजेक्ट अशा बहुविध क्षेत्रात रोल्स राईसची चौफेर टोलेबाजी सुरू होती. या सगळ्यासाठी अत्यावश्यक असणाऱ्या आधुनिक प्रयोगशाळा आहेत. कंपनीची मालमत्ता करोडो पौंडाची आहे. इतकी वर्षे चांगल्या फायद्यात असणारी ही कपनी अखेर दिवाळ्यात निघण्याची वेळ आली आहे रोल्स रॉईसच्या दिवाळखोरीबाबत सर्व देशाची भावना मजूर पक्षाच्या एका सदस्याने " A major national tragedy " अशा शब्दात व्यक्त केली आहे.

रोल्स-रॉईससारखे संस्थान इतक्या तडकाफडकी का खालसा व्हावे ?

१) अलिकडे कंपनीचे व्यवस्थापन चांगले नव्हते असा आक्षेप केला जातो. कारभारात अंदाधुंदी बोकाळली होती. मागच्या वर्षी कंपनीला तोटा आला होता

२) ही दिवाळखोरी इतक्या तडकाफडकी येण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे रोल्स-रॉईसने अमेरिकन लॉकहीड कंपनीशी केलेले कॉंट्रॅक्ट हेच होय. अमेरिकन लॉकहीड कंपनी तयार करीत असलेल्या ट्रायस्टार एअर बससाठी RB 211 जेट इंजिने पुरविण्याची जबाबदारी रोल्स-रॉईसने घेतली होती.

ही इंजिने तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा अंदाज साफ चुकला. या खर्चाच्या अंदाजावर विक्रीची किंमत ठरविली होती. खर्चाचा अंदाज चुकल्यामुळे विक्रीची किंमत खूपच कमी होती. त्यातच इंग्लंडमध्ये झपाट्याने झालेल्या किंमत वाढीमुळे खर्च अधिक वाढला. त्यामुळे जमा थोडी व खर्च जास्त असा आतबट्ट्याचा व्यवहार झाला.

किमतीशिवाय बाकीच्या अटीही उदा. इंजिने पुरविण्याची तारीख वगैरे सर्व कलमे रोल्स-रॉईसला अत्यंत जाचक होती. इंजिने वेळेवर न पुरविल्यास फार मोठया दंडाची योजना कॉंट्रॅक्टमध्ये होती. शेवटी व्हायचे तेच झाले. रोल्सरॉईस वेळेवर इंजिने पुरवू शकली नाही. आता रोल्स-रॉईसने लक्षावधी पौंडाची नुकसान भरपाई अमेरिकन लॉकहीड कंपनीला देणे भाग आहे. बुडत्याचा पाय अधिकाधिक खोलात जात होता. सर्व घटकांचा पूर्ण विचार न करिता असे धोकादायक कॉंट्रॅक्ट रॉल्स-रॉईसने केलेच कसे याचेच सर्वांना आश्चर्य वाटत आहे.

या इंजिनांचे वजन कमी व्हावे म्हणून खास संशोधन करून तयार केलेल्या कार्बन फायबरचे पंखे करण्यात आले होते. पण इंजिनाची चाचणी घेत असताना पक्षांच्या धडका बसून पंखे निरुपयोगी झाले व इंजिनाला नुकसान पोचले. त्यामुळे कार्बन फायबरचे पंखे काढून त्याच्याजागी टिटॅनियमचे वजनदार पंखे बसवावे लागले. त्यामुळे कार्बन फायबरच्या संशोधनावर खर्च झालेले लाखो पौंड अक्कल खाती लिहून त्यावर पाणी सोडावे लागले. त्यामुळे इंजिनिअरिंग डिझाईनच्या क्षेत्रात हा आश्चर्यकारक कार्बन फायबर नवीन दालने उघडील ही आशा मनातील मांडे ठरली. या सगळ्यावर इतका प्रचंड खर्च झाला की आता खाका वर करण्याखेरीज कंपनीला गत्यंतर उरले नाही.

रोल्स-रॉईसारखी कंपनी बंद पडल्याने त्याचे परिणाम काय होतील ? इंग्लंडच्या कारखानदारीच्या व अर्थव्यवस्थेवर याचे फार वाईट व दूरगामी परिणाम होतील. लक्षावधी पौंडाच्या परकी चलनास इंग्लंड पारखे होईल. आधिच त्यांच्या अर्थव्यवस्थेपुढे सूत धरण्याची पाळी आली आहे त्यात हा फटका सहन करणे त्यांना अवघड होईल. या कंपनीत ८८००० कामगार आहेत. इंग्लंडमधील कित्येक गावेच्या गावे रोल्स रॉईसवर जगत आहेत. ही कंपनी परत सुरू झाली तरी पण मोठ्या प्रमाणावर कामगार कपात होईल. तेव्हा त्यांच्या परिस्थितीची कल्पनाच केलेली बरी. रोल्स-रॉईससाठी संशोधन करणाऱ्या व तिला सुटे भाग पुरविणाऱ्या सुमारे २०० कंपन्या इंग्लंडमध्ये आहेत. या कंपन्या अक्षरशः रोल्स-रॉईसच्या कृपेवर जगत होत्या. आता या कंपन्यांच्यावर व त्यांच्या कामगारांच्यावर काळाची कुऱ्हाड कोसळणार आहे.

रोल्स-रॉईस ती RB–211 जेट इंजिने पुरवू शकेल का नाही हे ठरविण्यासाठी तांतडीने बोलणी सुरू झाली आहेत. अजूनही आशेचे काही किरण दिसत आहेत.

कारण श्री. फ्रेडरीक कोरफिल्ड या मंत्री महाशयांनी पार्लमेंटमध्ये सांगितले की हा इंजिन प्रोजेक्ट वाचविणे आवश्यक आहे. पण त्यासाठी एकत्रित प्रयत्न सुरू करण्यापूर्वी रोल्स रॉईस व अमेरिकन लॉकहीड या दोन्ही कंपन्यांनी या प्रश्नावर सांगोपांग चर्चा करावी. विमानाची इंजिने तयार करणारी डिव्हीजन ताब्यात घेण्यास सरकारने तयारी दाखविली आहे. पण त्या कॉंट्रॅक्टमधील कलमाप्रमाणे रोल्स रॉईसने जी लाखो पौंडाची नुकसानभरपाई अमेरिकन् लॉकहीड कंपनीला द्यायची आहे तिची जबाबदारी घेण्यास सरकारने नकार दिला आहे. या नकारामुळे इंग्लंडची पत अधिकच कमी होईल अशी भिती व्यक्त केली जात आहे.

इंजिनांची ही डिव्हीजन सुरू रहावी म्हणून इंग्लंडमधील सर्व कामगार युनियन खटपट करत आहेत. कारण ही डिव्हीजन सुरू राहिली तरच हजारो कामगारांना काम मिळणार आहे. त्यामुळे, कंपनी ही डिव्हीजन सुरू ठेवण्यास असमर्थ ठरल्यास कामगारांनी एकत्र येऊन ही डिव्हीजन सुरू ठेवणे शक्य होईल का यावर ते विचार विनिमय करत आहेत. रोल्स रॉईसच्या या दिवाळखोरीचा परिणाम अमेरिकन लॉकहीड कंपनीवरही झाला आहे. ट्रायस्टार एअर बसच्या प्रोजेक्टवर काम करणाऱ्या ६५०२ कामगारांना ले–ऑफ देणे त्यांना भाग पडले आहे.

डिबेंचर्सची रक्कम परत करणे कंपनीला शक्य होणार नाही तेव्हा डिबेंचर होल्डर्सनी रिसिव्हर नेमावा अशी नोटीस कंपनीने दिली. अशा तऱ्हेने कंपनीने आपली दिवाळखोरी जाहीर केल्याबरोबर शेअर बाजारात रोल्स रॉईसच्या शेअर्सची खरेदी विक्री बंद करण्यात आली. नुकतीच ती उलाढाल पुन्हा सुरू करण्यात आली आहे. जेव्हा उलाढाल बंद करण्यात आली त्यावेळी कंपनीच्या एका शेअरचा भाव ७ शिलींग ४ पेन्स इतका होता. उलाढाल सुरू झाल्या-झाल्या तो भाव केवळ ४ पेन्स इतका खाली कोसळला. शेवटी तो १ शिलींग ३ पेन्सवर स्थिरावला. रोल्स-रॉईसच्या सुवर्ण युगाची शेवटची आठवण म्हणून कित्येक जण हे कवडीमोल शेअर्स खरेदी करत होते. कंपनी जेव्हा अगदी जोरात होती तेव्हा तिच्या सर्व शेअर्सची मिळून बाजारात किंमत होती १७९ दशलक्ष पौंड. आता त्याच शेअर्सची किंमत फक्त ३ दशलक्ष पौंड झाली आहे.

पण कुठल्याही परिस्थितीत ब्रिटीश सरकार ही कंपनी बंद पडून देईल असे वाटत नाही. राष्ट्रीयीकरण करून ही कंपनी चालू ठेवणेच भाग आहे. वेगवेगळ्या डिफेन्स प्रोजेक्ट व विमान इंजिनाच्या डिव्हीजनचे राष्ट्रीयीकरण केले जाईल. यामुळे पूर्णपणे धुळीस मिळण्यापासून ही कंपनी वाचेल. पण काहीही झाले तरी ब्रिटीश अभिमानाला व पतीला जो तडा गेला आहे तो जुळून येणे सर्वथा अशक्य आहे. इतके दिवस ब्रिटीश मालाच्या उच्च दर्जाबद्दल 'रोल्स रॉईस' हा परवलीचा शब्द होता. पण एकदा बूंदसे गई तो....!

□ □ □

एक छोटा संस्मरणीय कार्यक्रम

# राष्ट्रीय विजेत्यांचा विद्यापीठात सत्कार

'तुम्ही खेळाडू मोठे भाग्यवान आहात, केवढे तुमचे कौतुक आणि काय तुमची सरबराई! येण्याजाण्याचा, रहाण्याजेवण्याच्या खर्च देऊन तुम्हाला निमंत्रणे चांदीचे चषक आणि सुवर्णपदकांची तुम्हाला बक्षिसे. आमच्यावेळी पदरमोड करून सामन्याला जावे लागे आणि बरोबर बांधून आणलेले शीळे तुकडे चार दिवस खावे लागत. राणासंगाएवढया जखमा झाल्या तरी साधे आयोडीन लावायला मिळायची मारामार.' सातारचे बबनराव उथळे, सोलापूरचे यल्लाप्पा जेनुरे अथवा मुंबईचे जामसिंडेकर असे कबड्डीक्षेत्रातील पंधरावीस वर्षापूर्वीचे रथी-महारथी भेटले की बऱ्याच वेळा त्यांच्या बोलण्यात वरील सूर उमटतो. शिवाजी विद्यापीठातील समारंभात सहभागी होताना मला पुन्हा त्यांच्या या उद्‌गाराची आठवण होत होती. खेळाडूचे यश हे त्याला नेहमीच आनंददायी असते पण त्याचे जाणीवपूर्वक कौतुक झाले की तो आनंद वेगळाच असतो. विद्यापीठ स्तरावर खेळाडूला पोषक वातावरण तयार झाले तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मैदान गाजविणारे खेळाडू तयार होतील असे नेहमी बोलले जाते पण या उपक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी प्रयत्नपूर्वक करणारी जी थोडी विद्यापीठे आहेत त्यात शिवाजी विद्यापीठाचे नाव अग्रभागी घ्यावे लागेल.

या सर्व कार्यक्रमातील एक प्रमुख उपक्रम म्हणजे आंतरविद्यापीठ स्पर्धेत आणि अखिल भारतीय स्पर्धेत कुठल्याही खेळात चमकणाऱ्या खेळाडूंचा सत्कार. भारतातील सर्व विद्यापीठांचा पराभव करून अजिंक्य ठरलेला संघ अथवा खेळाडू किंवा महाराष्ट्रातील नामवंत व्यावसायिक खेळाडूंच्या बरोबरीने कौशल्य दाखवून कॉलेजात असतानाच महाराष्ट्र राज्याच्या संघात समावेश करून घेणारा क्रीडापटु ही निश्चितच आशास्थाने असतात.

कार्यक्रम अत्यंत वक्तशीरपणे चालू झाला. आपल्या सुरुवातीच्या छोट्या प्रास्ताविकात मेघनाथ नागेशकरांनी विद्यापीठाने क्रीडाक्षेत्रातल्या उत्कर्षासाठी चालवलेल्या प्रयत्नाची माहिती सांगितली. दोन उपक्रम मला नवीन वाटले आणि अनुकरणीय. शिवाजी विद्यापीठ दोन आठवड्याचे एक प्रशिक्षण शिबीर दरवर्षी कॉलेजच्या सुरुवातीला, संलग्न असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात घेते. खोखो, कुस्ती, ॲथलेटिक्स अशा खेळांचा त्यात समावेश असतो. जिल्ह्यापुरते मर्यादित असल्याने संख्या फार नसते आणि नवोदित खेळाडूंना दरवर्षी अधिकारी माणसाकडून सुरुवातीचे धडे गिरवावयास मिळतात, ज्याचा फायदा त्यांना वर्षभर होतो. पण विद्यापीठ यापेक्षाही अलिकडच्या पायरीपासून प्रयत्न करते. विद्यापीठाने नेमलेले क्रीडातज्ञ उन्हाळ्याचे दोन महिने शाळांतील होतकरू मुलांना स्वतः जिल्ह्याच्या गावी जाऊन मार्गदर्शन करतात. या शिवाय विद्यापीठातील सर्व चांगल्या खेळाडूंना एकत्रित करून देण्यात येणारे शिक्षण निराळेच. निरनिराळ्या कॉलेजात खेळाडूंना संधी देत असतील, पण वर्षभर सूत्रबद्धपणे विद्यापीठ म्हणून खेळासाठी धडपडणारे असे महाराष्ट्रातले दुसरे विद्यापीठ तरी माझ्या माहितीत नाही.

साधारणपणे सर्व ठिकाणी बक्षिससमारंभ हा कार्यक्रम सगळ्यात शेवटी ठेवलेला असतो. (कारण त्यानंतर कार्यक्रमाला प्रेक्षक थांबतो कोण? या वर्षीच्या सांगलीच्या राज्यक्रीडामहोत्सवात तर आभाराचा सर्व मामलाही बक्षिस समारंभाच्या आधी उरकण्यात आला होता. बक्षिसे देण्याआधीच पारितोषक वितरण केल्याबद्दलचे आभार मानण्याची कल्पना विनोदी नाही काय?) या कार्यक्रमात मात्र सुरुवातीला बक्षिससमारंभ पार पडला.

कोल्हापूरचे आणि मल्लांचे नाते अतूट आहे. कोल्हापूरला स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठानेही ही परंपरा संभाळली आहे. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सामन्यात अजिंक्य ठरलेल्या या चौघांच्या कुस्तीगीर संघाचा पहिल्यांदा ब्लेझर देऊन सन्मान झाला. आंतरराष्ट्रीय कुस्तीचे दार ठोठावणारा संभाजी पवार हा या चमूचा नायक होता. (विद्यापीठाचा 'कलर'–ब्लेझरच्या कोटाचे कापड बहुधा नुसते दिले जाते. बाकीची जबाबदारी खेळाडूवर टाकून. या ठिकाणी कोट तयार करून त्यावर विद्यापीठाचे मानचिन्ह लावून देण्यातील संयोजकता निश्चितच कौतुकास्पद होती.) यानंतर दयानंद कॉलेजच्या दोन व्हॉलीबॉलच्या विद्यार्थिनी,

आणि एक खोखोची खेळाडू. कबड्डीमध्ये सांगलीचे झांबरे आणि दाभोळकर सोलापूरच्या औरंगाबादकर आणि बास्केटबॉलमध्ये वालचंद इंजिनिअरिंग विद्यालयाचा विद्यार्थी यांच्या कर्तृत्वाचे कौतुक झाले – प्रत्येकी अडीचशे रुपयाचे रोख पारितोषक देऊन बक्षिस घेताना घेणाऱ्याला आणि देणाऱ्यालाही कसे घसघशीत वाटले. यानंतर कुलगुरूंनी आपल्या भाषणात या स्वरूपाचा समारंभ घडवून आणणारे शिवाजी विद्यापीठ हे भारतात एकमेव आहे याची कल्पना दिली आणि कार्यक्रमापासून मिळालेली स्फूर्ती टिकवा, नवोदितांत रूजवा आणि विद्यापीठाचा

## शुभेच्छा !

कबड्डी हा खेळ गिरणी कामगाराचा आणि खेडवळांचा असा समज बरेच दिवस रुढ होता. आजही काही प्रमाणात तो आढळून येतो. कबड्डीच्या मैदानावर ज्यांची जडणघडण झाली, ज्यांनी कबड्डी क्षेत्रावर मनापासून प्रेम केले अशा व्यक्ती जर समाजात मान्यता मिळवून उभ्या राहिल्या तर हा समज खोटा ठरण्यात निश्चितच मदत होईल.'

सांगलीचे तरुणभारत व्यायाम मंडळ ही सांगली मधील कबड्डी क्षेत्रात अनेक वर्षे नावाजलेली क्रीडासंस्था आहे. त्याचे अध्यक्ष श्री अण्णासाहेब गोटखिंडे हे आज सांगली जिल्ह्यातून काँग्रेसच्या तिकीटावर लोकसभेची निवडणूक लढवत आहेत. कबड्डीतील एक अत्यंत निष्णात पंच म्हणून त्यांची ख्याती आहे. कबड्डी संघाचे व्यवस्थापक आणि मार्गदर्शक म्हणून त्यांची कामगिरी किती मोलाची ठरते, याचा अनुभव अलहाबादला राष्ट्रीय सामने खेळताना मी स्वतः घेतला आहे. सांगली भाग हा महाराष्ट्र काँग्रेसचा बालेकिल्ला. त्यामुळे ते निश्चितपणे निवडून येतीलच. लोकसभेतील खासदार म्हणून काम करताना राष्ट्रीय प्रश्नाबरोबर राष्ट्रीय खेळाच्या प्रश्नालाही ते चालना देतील ही खात्री आहे.


रतन पार्टे या कोल्हापूरच्या गोखले कॉलेजच्या विद्यार्थिनी. इंदूरच्या कबड्डी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत त्या दक्षिण महाराष्ट्राकडून खेळल्या होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघातही त्यांची यंदा निवड झाली होती.

भालजी पेंढारकरांच्या सुनबाई या आगामी चित्रपटात नायिकेच्या भूमिकेत त्या रुपेरी पडद्यावर पदार्पण करतील. आज कबड्डीचे मैदान गाजविणाऱ्या या भावी चित्रतारकेची उद्याची रुपेरी कारकीर्दही यशस्वी ठरो हीच सदिच्छा !

नावलौकीक वाढवा, असे आवर्जून सांगितले. सत्कार झालेल्या एका खेळाडूने शेवटी उस्फुर्तपणे आपल्या भावना व्यक्त केल्या. 'यश कर्तृत्वाने मिळते हे अर्धसत्य असते. पूर्णसत्य हे असते की क्रीडारसिकांच्या शुभेच्छा आणि इथे जमलेल्या थोरामोठ्यांचे शुभआशीर्वाद यांचा वाटा त्यात नेहमीच मोठा असतो...विद्यापीठातुन बाहेर पडल्यावरही मिळालेल्या यशाचा पक्का पाया हा या विद्यापीठाच्या मैदानावर घातला गेला याची आम्ही सदैव कृतज्ञापूर्वक जाणीव ठेवू' हे त्यांचे मनोगत सर्वांनाच समारंभाचे मर्म ओळखणारे वाटले.

समारंभातील काही गोष्टी मात्र निश्चित खटकल्या. शिवाजीचे नाव असलेल्या आणि बहुसंख्य खेळाडू राष्ट्रीय खेळातील विजेते असताना सर्वसमारंभ इंग्लिशमधून चालविण्याचा सोस कशाला? शिवाजीच्या विद्यापीठाला मातृभाषा परकी वाटावी? परीक्षेचे दिवस झपाट्याने जवळ येत असताना समारंभाचा दिवस निवडलेला. त्यामुळे उपस्थितिही बेताचीच. ज्या कॉलेज विद्यार्थ्यांना असल्या कार्यक्रमातून स्फूर्ती मिळावी त्यांना प्रचंड संख्येने येता येईल अशी वेळ आणि जागा निवडण्याची दक्षता यापुढे तरी घेतली जावी. सर्व खेळाडूंना एकमेकाचा परिचय अनौपचारिकपणे व्हावा असा एखादा छोटासा कार्यक्रम – कोणत्याही स्वरूपाचा मुख्य कार्यक्रमाच्या आधी वा नंतर असावयास हवा होता. बक्षिस मिळवणाऱ्या खेळाडूत सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यातला एकही खेळाडू नव्हता. पुढल्या वर्षीच्या कर्तृत्ववान खेळाडूत साऱ्या जिल्ह्यातील खेळाडू असतील आणि त्यांची संख्याही वाढली असेल अशी आशा करू या!

अवघा चाळीस मिनिटाचा हा कार्यक्रम आपुलकीचा, जिव्हाळ्याचा, नेटका आणि सुटसुटीत. खेळाडूंना सुखविणारा आणि स्वतःचे श्रम सार्थकी लागले असे समाधान देणारा. राष्ट्रीय पातळीवर चमकणारे हे वीर आता या कार्यक्रमातून स्फूर्ति घेतील आणि पुढील वर्षी नेपाळला जाणाऱ्या कबडीसंघात अथवा आंतरराष्ट्रीय कुस्तीच्या मैदानात प्रवेश मिळवण्यासाठी कंबरा कसतील असे त्यांच्या उल्हासित चेहऱ्यावरून वाटले खरे!



पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

## २० ते २६ फेब्रुवारी १९७१

**मेष** : शरीर प्रकृतीला जरासे जपण्याची जरूर आहे. तनुस्थानचा अधिपति मंगळ मृत्युस्थानी आहे. तो चांगला नाही. पण त्याचेजवळ भाग्येश व व्ययेश गुरु आहे तो अर्धेफळ चांगले देईल. प्रवासात अपघात होण्याचा योग आहे. धनस्थानची स्थिती जरा नरमच राहील. घरात धार्मिक कार्य होण्याचा योग मंगळवार बुधवारी येईल. आध्यात्मिक विचार प्रबळ होतील.

विद्याभ्यासात प्रगती होईल. सरकारी मदत मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. मशिनरीचा, जागा जमिनीचा व्यवहार करणारांना उत्तम फायदा होण्याचा योग आहे. पत्नीकडून संपूर्ण मदत होईल. मित्राकडून व भावंडांकडून संपूर्ण मदत होईल. सरकारी कामात यश प्राप्त होईल. घरात आई अगर वडील आजारी पडण्याचा योग आहे. त्यावर उपाय गजांत लक्ष्मीच्या तसबिरीला हार घालणे.

चंद्राचे भ्रमण ९–१०–११ या स्थानातून आहे ते चांगलेच आहे. शुभतारखा २०।२१।२२।२५।२६.

**वृषभ** : शरीर प्रकृती बिघडण्याचा योग आहे. मधुमेहाचा अगर शुक्रक्षयाचा रोग होण्याचा योग आहे. आत्मघातकी विचार मनात येतील. मंगळवार बुधवार याचा अनुभव जास्त येईल. धनस्थिती चांगली राहील. सरकारातून येणारा पैसा गुरुवार शुक्रवारी हातात पडेल. प्रवासात त्रास होईल. भावंडे मनाविरुद्ध वागतील. घरात काही तरी शुभसमारंभ होईल. अचानक धनलाभाचा योग येईल

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरीत असतील त्यांना अनपेक्षित पगारवाढ होईल फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांना सरकारची संपूर्ण मदत मिळेल. नवीन लायसेन्स मिळतील. इंडिकेट गटाच्या व २७ ते ३२ वय असलेल्या व्यक्तींना याचा फारच फायदा उठविता येईल. मित्राकडून प्रत्येक बाबतीत मदत होईल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातून आहे ते साधारण आहे. शुभ तारखा २२ते २६.

**मिथुन** : शरीर प्रकृती चांगली असेल. धनस्थानला जरा अडचणी निर्माण होण्याचा योग आहे. येणारी रक्कम हातात पडण्याला उशीर लागेल. भावंडे चांगली वागतील. पराक्रम योग आहे. सरकारी अवघड कामात यश मिळेल. घरात काहीतरी शुभसमारंभ घडेल. पत्नी मोहरी जाण्याचा योग आहे. गुरु मंगळ सहाव्या घरात आहेत ते शत्रूनाश करतील व मानमान्यतेत वाढ होईल. धार्मिक वृत्ती वाढेल.

विद्याभ्यासात चांगले यश प्राप्त होईल. संततीचा सर्व बाजूनी उत्कर्ष होईल.

कलावंताच्या कलेचे कोडकौतुक होईल. पेंटर, चित्रकार, साहित्यिक, लेखक, प्रकाशक, शास्त्रीय पुस्तकांचे लेखक याना दिवस फार चांगले आहेत. व्यापारात यश मिळेल. सार्वजनिक कामात यश मिळण्याचा योग कमी आहे. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तींना निवडणुकीत यश येण्याचा योग कमी आहे. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे ते साधारण आहे. शुभतारखा २०।२१।२२।२५।२६.

**कर्क** : शरीर प्रकृती चांगली राहील. सरकारी नोकराना चांगला धनलाभ होईल. मानसिक अस्वस्थता वाढेल. प्रवास योग येईल तो टाळावा. भावंडासह मातुल घरी जावे लागेल. हटयोग रविवारी सोमवारी येईल. आध्यात्मिक विचार मनात येतील. भागिदार नीट वागणार नाहीत. हा अनुभव ४२ वयाच्या पुढील व्यक्तींना जास्त येईल.

विद्यभ्यासात अत्यंत प्रगती होईल. पदार्थ विज्ञान शास्त्रांच्या विद्यार्थ्यांचे अभ्यास पूर्ण होतील. एकमेव राजयोगकारक ग्रह मंगळ पंचमात भाग्येश गुरुबरोबर आहे. हातात जे काम घ्याल त्यात यश येईल. मानमान्यता मिळेल. कुंडलीतील एकच वाईट योग दशमातील शनी. घरातील वृद्ध माणसाना मोठा आजार येण्याचा योग आहे. चद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे ते चांगले नाही. शुभ तारखा २०।२१।२२।२५।२६.

**सिंह** : शरीर प्रकृती चांगलीच राहील. धनस्थिती चांगली राहील. सरकारकडून येणारे पैसे हातात पडतील. भावंडाकडून सर्वतोपरी चांगली वागणूक होईल. बहिणी जास्त चांगल्या वागतील. घरात काहीतरी शुभसमारंभ होईल. जागा जमिनीबद्दल अत्यंत समाधानकारक घटना घडतील.

विद्येच्या जोरावर घरात भाग्योदय घडन येईल. ' विद्या धनं सर्वधन प्रधानम् ' हे सिद्ध होईल. संततीचा भाग्योदय बुद्धि वैभवावर होईल. २८ ते ३२ वय तील व्यक्तींना हा अनुभव येईल. कलाकार, शिल्पकार वगैरेतील व्यवसायिकांना अमाप धनलाभ होईल. फॅन्सी वस्तूंचे व्यापाऱ्याना प्रगतीपर आठवडा जाईल.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभतारखा. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**कन्या** : शरीर प्रकृती जरा नाजूक होईल. अंग दुखेल. धनस्थानाची स्थिती फार चांगली राहील. स्वपराक्रमावर पुष्कळ संपत्ती हातात पडेल. रविवार सोमवारी घरात सर्व नातलग व घरातील मडळी एकत्र येऊन शुभसमारंभ होईल. घरासंबंधीचे प्रश्न समाधानकारक रीतीने सुटतील.

विद्याव्यवसायात असणाऱ्यांना–शिक्षक, लेखक, प्रकाशक–जरासा मागे खेचणारा काल आहे. सरकारी मदत होणार नाही. संततीची वागणूक त्रासदायक होईल. पत्नीकडून सहकार्य मिळेल. फॅन्सी मालाचा व्यापार करणारांना कापड व्यापाऱ्यांना, सुगंधी तेलांचे व्यापाऱ्यांना दिवस प्रगती पथावर नणारे आहेत. चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभतारखा २०।२१।२२।२५।२६.

तूळ : शरीरप्रकृती चांगली राहील. धन स्थानची अवस्था अती उत्तम होईल. जमिनीबद्दलचे पैसे आपोआप हातात पडतील. हा योग रविवार सोमवारी येईल. प्रवास योग होईल. प्रवासात चांगला फायदा होण्याचा योग आहे. मंगळवार बुधवार घरात जरा मतभेद होण्याचा जोरदार योग आहे. मनावर ताबा ठेवावा. त्याकरता शंकराचे दर्शन घ्यावे.

विद्याभ्यासात यश मिळेल. शास्त्रांचे व तत्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांना हा योग जास्त चांगला आहे. मामाकडून अगर सासऱ्याकडून पैशाची मदत भरपूर होईल. भागिदारीच्या धंद्यात भरपूर फायदा होईल. मनात आत्मघातकी विचार थैमान घालतील प्रेम प्रकरणात यश येईल. २७ ते ३२ या वयातील व्यक्तीना हा अनुभव जास्त प्रमाणात येईल. वहातुकीचा व एजन्सीचे व्यवसायिकांना भरपूर नफा होईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून आहे. ते शुभफलदायी आहे. सर्व सप्ताहच शुभफलदायी आहे.

वृश्चिक : शरीरप्रकृती उत्तम राहील. स्वतःच्या कमाईचा अभिमान वाटण्याजोगी स्थिति असेल. रविवारी घरात व्यवसायातील भागिदार येऊन दिवस अत्यंत आनंदात जाईल. प्रवासयोग येईल. त्यात त्रासच होण्याचा जास्त योग आहे. सरकारी नोकराना प्रमोशन होण्याचा योग आहे. शुक्रवारी याबाबत शुभ संदेश मिळण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात भरपूर यश प्राप्ती होईल. विशेषतः भाषा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मानमान्यता प्राप्त होईल. स्त्री लंपटता वाढेल. घरात पत्नीचे वर्चस्व वाढेल. संततीचा उत्कर्ष होईल. २८ ते ३२ मधील मुलाना विशेषतः कन्या संततीतील फारच प्रगतीकारक दिवस जातील.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे ते फारच चांगले आहे. सर्वसप्ताह शुभ फलदायी आहे

धन : शरीर प्रकृती साधारण नरम राहील. अपचनाचा विकार वाढेल. पोटदुखण्याचा संभव आहे वाणीत कठोरपणा येईल. धनस्थिती अडचणिची निर्माण होईल सरकारी कामाकरता प्रवास घडेल. धाकट्या भावंडांशी वागणूक जरा वाईट होईल. विवाह समारंभाला जावे लागेल. व्ययातील गुरु मंगळ योग वाईट फल देणार नाही. गुरु चतुर्थस्थानावर पाहतो तो सुखहानी होऊ देणार नाही.

विद्याभ्यासात अनेक अडचणी निर्माण होतील. संतती आजारी पडण्याचा जोरदार योग आहे. पंचमातील नीचीचा शनी वडील बहिणीशी, भावजयीशी वितुष्ट आणील. मातुल घराण्यातील माणसे शनिवारी येतील. बौद्धिक व्यवसायिकांना दिवस फारच उत्तम आहेत. कलाकारांना कलेवर मानमान्यता प्राप्त होईल.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे ते बरे आहे. शुभ तारखा २०।२१-२३।२५।२६.

**मकर** • शरीर प्रकृती चांगली राहील. थोडासा हेकटपणा वाढेल. धनस्थिती बरी राहील. प्रवास योग येईल. त्यात इष्ट कार्यात यश येईल. लग्नेशशनी चवथ्या घरात येत आहे. स्वतःच घर निर्माण करील. मानमान्यतेला थोडासा कमीपणा येईल. गृहस्वास्थ्य बिघडेल. भावडे चांगली वागतील.

विद्याभ्यासात अपयश येईल. चित्रकला, गायनकला नेपथ्य यात असलेल्या व्यक्तींना सप्ताह बेताचाच आहे. भागिदाराशी मतभेद होण्याचा योग आहे. मंगळवार बुधवार या दृष्टीनी वाईट जातील. मित्रमंडळींकडून कोडकौतुक केले जाईल. सर्व तऱ्हेची मदत करतील. मानमान्यतेला थोडासा कमीपणा येईल. मकर राशी स्वभावतःच बेपर्वा असते. त्यामुळे सप्ताह थोडा बेपर्वाइत जाईल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे ते तितकेसे चांगले नाही. शुभतारखा २०।२१।२२।२५।२६.

**कुंभ :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानची स्थिती फारच चांगली असेल प्रवास योग येईल. सरकारी कामात भरपूर यश येईल. पराक्रमाचा योग आहे. हा अनुभव ३६ ते ४० वयातील व्यक्तींना जास्त येईल. शनिवारी मित्र मंडळी व सासुरवाडची मंडळी येतील. दिवस आनंदात जाईल. भावडांच्या विवाहाचा उत्तम योग आहे. मानमान्यता वाढेल. धार्मिक कार्य हातून घडेल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. अचानक धनलाभ होईल. संततीचा भाग्येदय होईल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तीना याचा अनुभव जास्त येईल. पत्नी अत्यंत चांगली मदतदार ठरेल. भागिदार सर्वबाजूनी मदत करतील. शनिवार रविवार मित्र सर्व बाजूनी सहाय्य देतील. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांना अत्यंत दिवस चांगले आहेत.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा २०।२१।२२।२५।२६.

**मीन :** शरीर प्रकृती फारच चांगली राहील. धनस्थितीत सुधारणा होईल. धनस्थानातील शनी भाषेत कठोरपणा आणील. तो आवरावा. प्रवास योग येईल. शनिवार रविवार घरांत कांहीतरी शुभ कार्य होईल. पराक्रम हातून घडेल. गृहसुखाला थोडासा कमीपणा येईल. एकादशातील राहू मित्रमंडळींकडून फसवणूक होण्याचा योग दाखवितो.

विद्याभ्यासात भरपूर यश मिळेल. नवमातील गुरू मंगळ या दृष्टिने फार चांगले आहेत. मेडिकल, इंजिनीअरचे कामे करणाराना खूपच प्रगतीकारक सप्ताह आहे. आध्यात्मिक विचार मनात उफाळून येतील. ४२ वर्षापुढील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा २०।२१।२२।२५।२६

□ □ □

 पृष्ठ ४ वरून

अस्थिरतेचा धोका पत्करणाऱ्या इंदिरा गांधींच्या अनुयायांनी-समर्थकांनी आता अंदाधुंदीचा बागुलबुवा उभा करून मते गोळा करावीत, हा खास भयग्रस्त साचा नमुना आहे. अंदाधुंदी, अराजक याचे भय कोणाला? ज्यांची स्थिती बरी आहे, जाण्यासारखी ज्यांच्याजवळ घरेदारे आहेत, मानसन्मानांची ओझी आहेत, जमीनदाऱ्या आहेत, खासदारक्या-मंत्रिपदे आहेत, खूप धनदौलत ज्यांनी गेल्या वीस-पंचवीस वर्षात वाममार्गाने बळकावून ठेवलेली आहे—अशांना. असा वर्ग आपल्या समाजात किती आहे? काँग्रेसी हिशोबाप्रमाणे देखील दहा-वीस टक्क्यांपेक्षा अधिक नाही. इतरांनी स्थिरतेच्या या अंगाईगीतांना कशासाठी साद घालायची? बहुसंख्य कंगाल आणि कफल्लकांच्या बाबतीत स्थिरता ही उलट वैरीणच ठरण्याचा संभव आहे. बंगाल-बिहारमध्ये १४४ कलम लागू असता, हजार हजार भूमिहीनांचे जथे, भाले-बरच्या घेऊन पोलिस चौक्यांना, सरकारी कचेऱ्यांना सशस्त्र बंदोबस्ताला न जुमानता वेढे घालत आहेत, या वार्ता स्थिरतावाद्यांच्या कानी आलेल्याच नाहीत काय?

शिवाय महाराष्ट्रात आजतागायत व दिल्लीत कालपरवापर्यंत काँग्रेसचे स्थिरशासन अस्तित्वात होतेच. समाजवादी समाजरचनेचे ठरावही संमत झालेले होते. मग या कार्यक्रमाची अंमलबजावणी का होऊ शकली नाही? कोण आडवे आले होते? समाजवाद याचा साधा सरळ अर्थ विषमता कमी करणे— मुख्यत: आर्थिक क्षेत्रातील— असा आहे. आणि स्थिर शासन असतानाही ही विषमता गेल्या वीस-बावीस वर्षांत वाढतच गेली असा यशवंतराव चव्हाणांसकट सर्व काँग्रेसी नेत्यांचाच जाहीर कबुलीजबाब हजर आहे. म्हणूनच स्थिरता कशासाठी हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. खरोखरच गेल्या वीस-बावीस वर्षांत समाजवादाच्या दिशेने काही पायाभरणी झालेली असेल, तर एखाददुसऱ्या निवडणूक अपयशाने हा पाया डळमळीत होण्याची भीति बाळगण्याचे कारणच काय? बहुतेक सर्व पक्षांचे कार्यक्रम सारखेच आहेत. एखादा स्वल्पविराम इकडचा तिकडे, एवढाच फरक निदान सामान्य मतदाराला तरी जाणवतो. प्रत्येक पक्षात डावे-उजवे गट आहेत, कुठलाही पक्ष निर्भेळ पुरोगामी वा प्रतिगामी म्हणून वेगळा ठरवता येत नाही. अशा स्थितीत समजा इंदिरा गांधी ऐवजी मधू लिमये, अटल बिहारी किंवा कामराज यांच्याकडे काही काळ सत्ता गेली तर असे काय मोठे आकाशपाताळ एक होणार आहे, समजत नाही. आणि गेल्या वीस-बावीस वर्षांत समाजवादाच्या दिशेने काहीच पायाभरणी झालेली नसेल तर अशी नालायक राजवट आणखी काही काळ चालू ठेवून तरी परिस्थितीत काय फरक पडणार आहे? आपणच आग पेटवायची आणि बोंब ठोकून बंबही बोलवायचा, तसा काहीसा हा प्रकार दिसतो.

बहुमत मिळविण्यासाठी आजच इंदिरा गांधींच्या पक्षाने इतक्या तडजोडी आणि देवाणघेवाणी केलेल्या आहेत, की त्यांच्या सरकारची स्थिरता ही फार जुजबी व वरकरणी राहण्याची शक्यताच अधिक आहे. राज्यासाठी वेगळा ध्वज मागणारे व देवदेवतांसकट सर्व हिंदू संस्कृतीचे तामीळनाडूमधून उच्चाटन करू पाहणारे द्र. मु. क. सरकार आपली किंमत वसूल केल्याशिवाय इंदिरा गांधींना सोडणार आहे काय ? केरळचे उजवे कम्युनिस्ट, पंजाबचे अकाली प्रांतिक स्वायत्ततेची मागणी आजच पुढे रेटीत आहेत. मुस्लीम लीग गृहमंत्रीपदाची मागणी करण्याइतपत धीट बनलेली आहे. आंध्र, महाराष्ट्र व राजस्थान या तीन प्रांतिक सुभेदारांना इंदिरा गांधींना भीक घालायला आजही तयार नाहीत. असा सगळा आतून पोखरलेला, अराष्ट्रवादी शक्तींचा गळफास मानेभोवती असलेला इंदिरावादी काँग्रेसपक्ष स्थिरसरकार देऊ शकेल असे खात्रीपूर्वक कोणीच सांगू नये.

मतदारांसमोर आज पर्याय आहेत दोन आघाड्यांचेच—इंदिरा आणि बडी. सुसंघटित, विशिष्ट तत्वज्ञानाने बांधलेला एकही निर्भेळ भारतव्यापी पक्ष डोळ्यासमोर नसल्याने मतदार आज गोंधळल्यासारखा दिसतो आहे. उमेदवाराच्या निष्ठा सरकत्या आहेत, कार्यक्रमांची सरमिसळ आहे, उक्ती आणि कृती यात दोन्ही आघाड्यांमध्ये भयानक अंतरे आहेत. दोन्ही आघाड्यांनी लोकशाही रक्षणाचा पवित्रा घेतलेला आहे, पथ्ये सांभाळायला, स्वतःवर बंधने घालून घ्यायला मात्र एकीचीही तयारी नाही. आयाराम गयारामांना पक्षत्यागानंतर किमान एक वर्ष तरी कुठल्याही निवडणुकीचे तिकीट कोणत्याही पक्षाने देऊ नये असा आचार संहिता समितीने नियम ठरवला. यशवंतराव चव्हाणच या समितीचे अध्यक्ष होते. पण गुजरायेत चोखावालांना, आंध्रमध्ये व्यंकटसुब्बय्यांना पक्षत्यागानंतर, मंत्रीपदांचा त्यांनी राजीनामा दिल्यानंतर अवघ्या चोवीस तासातच यशवंतरावांच्या काँग्रेसने तिकीटे दिली. मणिराम निवडणुकीत पराभव झालेला असतानाही टी. एन्. सिंग उत्तर प्रदेशात सत्तेला चिकटून राहतात आणि याची लोकशाहीसाठी कटिबद्ध झालेल्या बड्या आघाडीला जराही शरम वाटत नाही. कुठल्या तोंडाने हे 'बडे' इंदिरा गांधींना सत्तालोलुप ठरवू शकतात हा प्रश्न साहजिकच मतदार विचारणार. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप टांगलेले आहेत अशा हरेकृष्ण मेहताबांना नवकाँग्रेसमध्ये स्थान मिळते तर बिहारचे कर्पूरी ठाकुरांचे समाजवादी मंत्रिमंडळ आठवड्या आठवड्याला फुगतच राहते. 'लोकशाही' 'लोकशाही' म्हणून घसा खरवडून भाषणे करणाऱ्या जनसंघवाल्यांना शिवसेनेची ठोकशाही गोड वाटते, लोकशाहीचा उघड उघड गळा घोटायला निघालेल्या या संघटनेशी सोयरिकी जमवण्यासाठी हे वीर उत्सुक असतात, ही कसली तत्वनिष्ठा ?

असा सगळा बाजार आहे. वैयक्तिक नफा-तोट्याचे हिशेब, आवडीनिवडी,

स्नेहसंबंध यांना अशा परिस्थितीत प्राधान्य मिळणे अपरिहार्य आहे. तरीही एवढे सांगता येईल, की चालू राजकारणाची कोंडी फुटलीच तर ती बड्या आघाडीमुळे फुटण्याची थोडीफार शक्यता आहे. अर्थात बडी आघाडी म्हणजे 'बद्रीप्रसाद'साठी उभी राहिलेली आघाडी. हा बद्रीप्रसाद आज कमजोर आहे, असंघटित आहे, त्याला नेतृत्व योग्य लाभलेले नाही. तरीही 'तुम्ही कोणाबरोबर? इंदिरा गांधी की बद्रीप्रसाद?' या प्रश्नाचे उत्तर 'बद्रीप्रसाद' असेच 'माणूस' केव्हाही देईल. 'माणूस'च्या समाजवादी मित्रांना वाटते, की केवळ आर्थिक स्वरूपाच्या आंदोलनातून हा बद्रीप्रसाद सुसंघटित व सामर्थ्यसंपन्न होईल. 'माणूस'चा विचार थोडा वेगळा आहे. या देशात राष्ट्रवादी क्रांती अद्याप अपूर्ण आहे. अनेक उपराष्ट्रवादी, अराष्ट्रवादी, द्विराष्ट्रवादी, प्रांतजातीभाषाभेदवादी प्रवृत्ती येथे दबा धरून वावरत आहेत. या सर्व प्रवृत्तींवर वचक ठेवणारी आणि समंजसपणे हळूहळू एकात्म राष्ट्रनिर्मितीकडे वाटचाल करणारी जनसंघासारखी एखादी विशुद्ध राष्ट्रवादी शक्ती येथे प्रबळपणे नांदली पाहिजे असे 'माणूस'ला तीव्रतेने वाटते. मात्र या वाटचालीत 'बद्रीप्रसाद'बरोबर नसेल तर ती केवळ एक दिखाऊ, पोकळ शोभायात्राच ठरण्याचा धोकाही जनसंघीयांनी दृष्टिआड करू नये. एकात्मता आणि समता हे दोन्ही प्रवाह सरमिसळून येथे वाहिले पाहिजेत. यासाठी बड्या आघाडीवाल्यांनी एकच पर्याय पुणेकर नागरिकांसमोर ठेवला असता तर बरे झाले असते. 'बद्रीप्रसाद'चे दुर्दैवाचे दिवस लवकर न संपण्याची ही चिन्हे आहेत, दुसरे काय?

सगळेच अपूर्णांक आहेत. त्यातल्या त्यात जवळचा, 'बद्रीप्रसाद'साठी झटणारा प्रामाणिक व दक्ष उमेदवार पुणेकर मतदार निवडून देतील असा विश्वास वाटतो.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

अपूर्व गर्दीत सुरू आहे....

हिंदी युवकाचा खराखुरा प्रतिनिधी

भारत याची हृदयंगम कथा




निर्माता-लेखक-दिग्दर्शक : मनोजकुमार

संगीत : कल्याणजी-आनंदजी

कथा : श्रीमती शशी गोस्वामी

भूमिका : अशोक कुमार, सायरा बानू
मनोज कुमार प्राण प्रेम चोप्रा,
निरुपा रॉय, विनोद खन्ना, भारती
सोबत कामिनी कौशल, राजेंद्रनाथ

**लिबर्टी-डीलक्स**

रोज १-४५, ५-३०, ९
मुख्यचित्र : २, ५-४५, ९-१५

**ब्रॉडवे, लोटस, जयहिंद, रूपम**
डिफेन्स (कुलाबा), नेपच्यून (बांद्रा)
संगम-अंबर (अंधेरी), अनुपम (गोरेगाव)
अजंटा (बोरीवली), न्यू इरा (मालाड)
सहकार (चेंबूर), आकाश (कुर्ला), अशोक (ठाणे)
उदय (घाटकोपर), पूर्णिमा (कल्याण)
अमन (उल्हासनगर)

डीलक्स प्रकाशन

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

शेठ दमानि
विरुद्ध
रंगा वैद्य
सोलापुरातली
चुरशीची
सरळ लढत.

माणूस वार्तापत्र
पुढील अंकी